बुधवार, २८ डिसेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०२ अंक -१३१
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● WEDNESDAY 28 DECEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-131 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5

# कर्नाटक सरकारचा विधानसभेत निषेध

## सीमा प्रश्नावर ठराव एकमताने मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर: कर्नाटकमधील ८६५ मराठी भाषिक गावांची इंचन इंच जागा महाराष्ट्राची असून सीमा भागातील मराठी भाषिकांच्या पाठिशी महाराष्ट्र सरकार खंबीरपणे उभे असल्याचा ठराव विधानसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. गेल्याच आठवड्यात कर्नाटक सरकारने सीमाप्रश्नावर एकमताने ठराव मंजूर केला होता. त्यामुळे महाराष्ट्र सरकारवर दबाव वाढला. अखेर आज विधिमंडळात बेळगाव सीमा प्रश्नावर ठराव एकमतानं मंजूर करण्यात आला. हिवाळी अधिवेशन सुरू झाल्यापासून विरोधकांनी सातत्याने बेळगाव सीमाप्रश्नाचा मुद्दा उपस्थित केला जात होता. या प्रश्नावर ठराव आणण्याची मागणी केली जात होती.**



कर्नाटक सरकारच्या मराठी विरोधी प्रवृत्तीचा निषेध करणारा ठराव विधिमंडळात मांडण्यात आला. तो एकमताने मंजूर करण्यात आला. याचबरोबर बेळगाव, कारवार, निपानी, बिदर या शहरांसह सर्वोच्च न्यायालयातील दाव्यातील सर्व गावे कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात पाठपुरावा करण्यात येईल. सनदशीर मार्गाने लढा देण्यात येईल. ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत मराराष्ट्र सर्व ताकदीनिशी उभे राहील, अशा आशयाचा ठराव एकमताने मंजूर झाला. महाराष्ट्र विधानसभा नियम ११० नुसार कर्नाटकातील मराठी भाषिक (बेळगाव, कारवार, बिदर, बालकी, निपाणी) ८६५ गावातील इंच इंच जागा महाराष्टात समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. गेल्या अनेक दिवसांपासून कर्नाटक सीमा प्रश्नामुळे वाद पेटला आहे. कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी आक्रमक भूमिका घेतली असताना शिंदे-फडणवीस बोटचेपी भूमिका घेत असल्याचा हल्लाबोल विरोधकांनी केला. अखेर आज विधिमंडळात या प्रश्नावर ठराव मांडण्यात आला. तो एकमताने मंजूर झाला.

### महाराष्ट्र विधानसभा नियम ११० नुसार

१. कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणई, भालकी, बिदर या शहरांसह सर्वोच्च न्यायालयातील दाव्यातील सर्व गावे तथा शहरे यासह मराठी भाषिक ८६५ गावांची इंच न इंच जागा तिथल्या मराठी भाषिक नागरिकांसह कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात समाविष्ट करण्यासाठी आवश्यक तो सर्व कायदेशीर पाठपुरावा, प्रयत्न सर्वोच्च न्यायालयात करण्यात येईल.

२. मा. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेला सीमावाद हा सनदशीर मार्गाने अत्यंत खंबीरपणे दृढ निश्चयाने व संपुर्ण ताकदीनिशी लढा देण्यात येईल.

३. कर्नाटकातील बेळगाव, कारवार, निपाणई, भालकी, बिदर या शहरांसह ८६५ गावातील मराठी भाषिक जनतेसोबत महाराष्ट्र शासन खंबीरपणे निर्धाराने व सर्व ताकदीनिशी उभे आहे. केंद्र शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन महाराष्ट्र राज्याच्या न्याय मागण्यांसाठी मराठी भाषिक खेडे, घटक, भौगोलिक सलगता, मराठी भाषक लोकांची सापेक्ष बहुसंख्यता व महाराष्ट्रात समाविष्ट होण्यासाठीची तेथील लोकेच्छा या तत्वानुसार महाराष्ट्राला साथ देण्यासाठी केंद्र शासनाला देखील विनंती करते, असा ठराव ही विधानसभेत निर्धारपूर्वक एकमताने पारीत करीत आहे.

४. तसेच याबाबत केंद्र शासनाने गृह मंत्री भारत सरकार यांच्या बैठकीत झालेल्या निर्णयाची अमंलबजावणी करण्याचा आग्रह कर्नाटक शासनाकडे धरावा तसेच सीमा भागातील मराठी जनतेच्या सुरक्षिततेची हमी घेण्याबाबत सरकारला समज देण्यात यावी.

महत्वाची बातमी

## आरोग्य अधिकारी डॉ. खतगावकर निलंबित

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी जालना जिल्ह्याचे आरोग्य अधिकारी डॉ. विवेक खतगावकर यांना निलंबित करण्याच आदेश दिले आहत. करोना काळात अव्वाच्या सव्वा दराने निकृष्ट दर्जाच्या साहित्याची खरेदी करणे, महिलांसदर्भातील गैरवर्तन अशा आरोपांनंतर ही कारवाई करण्यात आली आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात आमदार नारायण कुचे यानी या संदर्भातील उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना आरोग्यमंत्री सावंत यांनी हा निर्णय जाहीर केला. डॉ. खतगावकर यांची राज्याच्या आरोग्य सचिवांमार्फत चौकशी करण्यात येणार आहे. राज्यात करोना महासाथीचा उद्रेक झाल्यानंतर अँटिजन किट, पीपीई किट, थर्मल गन, सॅनिटायझर, मास्क अशा आवश्यक साहित्याची अवाजवी स्वरुपाची खरेदी केल्याचा गंभीर आरोप डॉ. खतगावकर यांच्यावर आहे. हे साहित्य त्यांनी अव्वाच्यासव्वा दराने खरेदी केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे. तसेच हे साहित्य केवळ १५ दिवस वापरल्यानंतर ते गोदामात धूळ खात ठेवण्यात आले. इतकेच नाही, तर हे मोठी किंमत देऊन खरेदी केलेले अनेक प्रकारचे साहित्य प्राथमिक आरोग्य केंद्रांतील कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचलेच नाही.

# हे चोरांचे सरकार : प्रकाश आंबेडकर



आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** महाराष्ट्र सरकार लोकांच्या प्रश्नात गुंतण्यापेक्षा स्वतःच्या पक्षातील गुंत्यामध्ये अडकले आहे", असं वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत. महापुरुषांच्या अवमानाच्या निषेधार्थ वंचित बहुजन आघाडीने आज विधानभवनावर मोर्चा काढला आहे. यावेळी कार्यकर्त्यांना संबोधित ते असे म्हणाले आहेत. यावेळी बोलताना ते म्हणाले आहेत की, सध्याचे सरकार हे चोरांचं सरकार. हे सरकार बदलायला हवे.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "अतिक्रमणबद्दल न्यायालयीन लढाईत सरकार न्यायालयात बाजू मांडायला गेलं नाही. म्हणून न्यायालयाने अधिकाऱ्यांना अतिक्रमण हटवायला सांगितले. महाराष्ट्र सरकारला याबद्दल निवेदन देऊन विनंती केली. सरकारने आश्वासन दिली. मात्र काही ही करत नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लक्ष्य करत ते म्हणाले आहेत की, मुख्यमंत्री आपण रिक्षाचालक असल्याचे सांगताना. आपली सुरुवात ही सामान्य नागरिक म्हणून झाली आहे. ते म्हणाले, आज सर्वच सुलतान उभे झाले आहे. एक ना धड भाराभर चिंध्या अशी परिस्थिती आहे. सुप्रीम कोर्ट म्हणते मागासवर्गीयांचे अतिक्रमण सोडून इतर काढा. उच्च न्यायालय म्हणते सर्व अतिक्रमण काढा. मग ऐकायचे कोणाचे, छोटे साहेबांचे की मोठे साहेबांचे. वेगळ्या विदर्भाच्या मागणीबाबत ते म्हणाले की, "विदर्भवादी म्हणतात विदर्भ घेतल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. तर पश्चिम महाराष्ट्रातले नेते म्हणतात आम्ही सोडणार नाही. कारण विदर्भामुळेच राज्याचे वन क्षेत्र प्रमाण टिकून आहे.. विदर्भ वेगळा झाला तर पश्चिम महाराष्ट्रातील अर्धे उसाचे मळे वन क्षेत्रात आणावे लागतील. मग नेत्यांच्या कारखानदारीची अडचण होईल.' आरएसएसवर हल्लाबोल करत प्रकाश आंबेडकर म्हणाले, 'आरएसएसचा एजेंडा आहे, ना त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यात सहभाग घेतला आहे. ना ते सामाजिक लढ्यात सहभागी झाले आहे. त्यामुळे ते लोकांच्या डोक्यात जे महापुरुष आहे ते पुसून टाकण्याचा डाव आहे." मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याबद्दल बोलताना ते म्हणाले की, चंद्रकांत पाटील मला तुमचा शिवाजी पार्कवर जाहीर सत्कार करायचे आहे. 5 लाख लोक येतील. दादा तुम्हाला काहीच त्रास होणार नाही. मी म्हणतो चंद्रकांत पाटील खरे म्हणाले. त्यांनी कबुली दिली की भाऊराव पाटील आणि बाबासाहेबांच्या संस्था लोकवर्गणीतून उभ्या झाल्या. मात्र हे म्हणताना चंद्रकांत पाटील यांनी हे कबूल केले की आरएसएसच्या सर्व संस्था खोका संस्कृतीतून निर्माण झाल्या आहे.

## महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादाला नेहरू जबाबदार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** राज्याच्या विधिमंडळ हिवाळी अधिवेशनात आज महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नावर ठराव मंजूर करण्यात आला. या पार्श्वभूमीवर राज्यभरातून त्यावर प्रतिक्रिया उमटत असताना भाजपा आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी एका न्यूज चॅनलशी बोलताना थेट पंडित जवाहरलाल नेहरूंचा उल्लेख करत या प्रश्नासाठी त्यांनाच जबाबदार धरले आहे.
सुधीर मुनगंटीवार पुढे म्हणाले की, पंडित नेहरूंच्या चुकीमुळे मराठी भाषिक जबरदस्तीने कर्नाटकमध्ये समाविष्ट करण्यात आले. तेव्हा मैसूर प्रांतात समाविष्ट केले आणि नंतर कर्नाटक राज्य झाले. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी याबाबत ११ मार्च १९६० ला पहिला ठराव मांडला. पंडित नेहरूंची याबाबत प्रचंड अनास्था होती. हा प्रश्न सुटावा असे त्यांना वाटत नसावं असे निर्णय तेव्हा घेतले गेल्याचे पाहायला मिळाले, असं मुनगंटीवार म्हणाले. तेव्हा पंतप्रधान म्हणून हा प्रश्न सोडवण्यासाठी मदत करण्याऐवजी त्यांनी दोन मुख्यमंत्र्यांनी एकत्र बसून प्रश्न सोडवावा असं सांगितलं. त्यानंतरही प्रश्न सुटला नाही, तर दोन्ही राज्यांच्या चिटणीसांनी प्रश्न सोडवावा अशी सूचना केली. शेवटी बेळगाव, निपाणीसारख्या मराठी भाषिकांचा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयात आहे. दुर्दैवाने पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २०१०मध्ये सर्वोच्च न्यायालयातही चुकीचं प्रतिज्ञापत्र दिले. महाजन आयोगानंही चुकून स्वतःच्या मनाने काही सीमा ठरवून महाराष्ट्रावर अन्याय करण्याची भावना आयोगामध्ये निर्माण केली", असे मुनगंटीवार यांनी नमूद केले.

# महसूल मंत्री विखे पाटलांनी केलेले आरोप खोटे व दिशाभूल करणारे

## काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे निवेदन : आपल्या खात्याच्या कामकाजाची प्राथमिक माहिती नाही हे राज्याचे दुर्दैव

आधुनिक केसरी न्यूज

मुंबई : आपले भ्रष्ट चेले अब्दुल सत्तार यांना वाचविण्यासाठी विद्यमान महसूल मंत्र्यानी आज नागपूर माध्यमांसमोर असत्य कथन करत खोटी माहिती देऊन राज्यातील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. बाळासाहेब थोरात यांना कालच दुखापत झाल्यामुळे ते मुंबईतील रूग्णालयात उपचार घेत आहेत त्यामुळे ते सभागृहात उपस्थित नाहीत. ते उपस्थित असते तर त्यांनी या संदर्भात स्वतः सविस्तर माहिती सभागृहाला आणि जनतेला दिली असती. पण ते उपलब्ध नसल्यामुळे या संदर्भातील वस्तुस्थिती जनतेच्या माहितीसाठी आम्ही देत आहेत. मंत्री अब्दुल सत्तर यांच्या प्रकरणासंदर्भात माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देत असताना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे यांनी दोन मुद्दे मांडले.
या संदर्भातील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे. हे महसूल मंत्र्यांचे विधान निखालस खोटे आणि खोडसाळपणाचे आहे.
मुळात बाळासाहेब थोरात महसूल मंत्री असताना त्यांनी नागपूर मध्ये कुठल्याही गायरान जमिनीचे वाटप केले नाही. अशी जमीन वाटप केली असल्यास त्याचे आदेश महसूल मंत्र्यांनी उपलब्ध करून द्यावेत. नागपूर सुधार प्रन्यास (NIT) शी संबंधित एक अर्धन्यायिक प्रकरण महसूल मंत्री म्हणून थोरात यांच्या समोर सुनावणीसाठी आले असता, नैसर्गिक न्यायानुसार प्रकरण फेर चौकशीसाठी पाठवले होते. प्रकरण फेर चौकशीला पाठवणे म्हणजे जमीन वाटप नव्हे, हे महसूल मंत्र्यांना समजत नसेल तर त्यांनी ते उपमुख्यमंत्री महोदयांकडून समजून घ्यायला हवे. खोटेनाटे आरोप करून सरकारची अब्रू वाचवण्याचा अयशस्वी प्रयत्न महसूल मंत्र्यांनी करून पाहिला पण यातून त्यांचे अज्ञान जनतेसमोर आले असून त्यांच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या आहेत. असे बेफाम आरोप करण्यापेक्षा मंत्री महोदयांनी आपल्या खात्याच्या कामकाजाची नीट माहिती घेऊन अभ्यास करून जनतेच्या हितासाठी काम केले तर त्यातून राज्याचा फायदा होईल.




**मुद्दा क्र. १ :गायरान जमिनीचे वाटप महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या काळात झाले.**
- महसूल मंत्री असताना बाळासाहेब थोरात यांनी एक इंचही गायरान जमिनीचे वाटप केलेले नाही.
- महसूल विभागात मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यामध्ये विषय वाटप केलेले असते. त्यानुसार तत्कालीन राज्यमंत्री यांच्याकडे अमरावती विभागाची जबाबदारी होती. भाजप सेना युती सरकारच्या 2014 ते 2019 काळात चंद्रकांत पाटील महसूल मंत्री असतानाही अमरावती विभागाची जबाबदारी राज्यमंत्र्यांकडेच होती.
- या विभागातील अर्धन्यायिक प्रकरणे चालविण्याची जबाबदारी राज्यमंत्र्यांची होती. शिवाय या प्रकरणामध्ये देण्यात येणाऱ्या निकालाची जबाबदारी ही वैयक्तिक असते. त्यांनी दिलेले निकाल मंजुरीसाठी महसूल मंत्र्यांकडे येत नाहीत. त्यामुळे वाशिम येथे झालेल्या गायरान जमिनीच्या वाटपाशी तत्कालीन महसूलमंत्र्यांचा कुठल्याही प्रकारे संबंध येत नाही.

कॅबिनेट मंत्री आणि राज्यमंत्री यांच्यातील विषय वाटप जर विद्यमान महसूल मंत्र्यांना समजत नसेल तर हे मोठे अज्ञान आहे.

**मुद्दा क्र. २ : नागपूर येथे एनआयटीमध्ये महसूल मंत्र्यांच्या काळात असेच प्रकरण घडल्याचा उल्लेख त्यांनी केला.**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## ' तेच ते ... '


आधुनिक केसरी

म्हणजे नेमकं काय होतं ? आपला मूळ अर्थ गमावून बसतात. आपल्या बऱ्याचशा प्रथा, परंपरांचं असंच होतं नाही का ? एक किस्सा आठवला. एक गुरु होते. आपल्या शिष्याना ते शिकवत ( अर्थात शिकवणं हेच त्यांचं काम ! दुसरे लोक दुसरं काही करत असतील तर माहिती नाही ) असत. तर शिकवताना व्हायचं काय की एक मांजर त्यावेळी तेथे येऊन त्यांना त्रास द्यायचं. मग ते गुरु आपल्या शिष्यांना त्या मांजराला बांधून ठेवायला सांगत आणि आपले शिकवणे सुरु करीत. पुढे काही काळानंतर ते गुरु निवर्तले. त्यांची जागा त्यांच्या एका शिष्याने घेतली. तो गुरुपदी जाऊन बसला. पण नियमानुसार तो आपले प्रवचन सुरु करण्याआधी त्या मांजराला त्याच्या शिष्यांना बांधून ठेवायला सांगत असे. पुढे ते मांजरही मेले. शिष्यांनी दुसरे एक खास मांजर धरून आणले. ते बांधले आणि मग प्रवचन सुरु झाले. अशा या काही काही गमतीदार ( आणि निरर्थकही )परंपरा !

आपण कोणत्याही सरकारी कचेरीत ( शुद्ध मराठीत ऑफिसात ! ) गेलो



की तेथील अधिकारी, कर्मचारी आपल्याला कोणत्याही कामासाठी ' विहित नमुन्यात ' अर्ज करायला सांगतात. अर्थात ' विहित नमुन्यात ' अर्ज केल्यानंतर तुमचे काम ' विहित नमुन्यातच 'होईल असे काही सांगता येत नाही. ( काही वेगळे मार्ग तुम्हाला अवलंबावे लागू शकतात ! ) अगदी तलाठी कार्यालयात गेले तरी तो आपल्याला विहित नमुन्यात अर्ज करायला सांगतो. मग माझ्यासारखा थोडंफार चार बुकं शिकलेला पण सरकारी कामांशी फारसा परिचित नसलेला माणूस विचारतो, ' भाऊसाहेब, विहित नमुन्यात म्हणजे कसा हो ? ' यावर भाऊसाहेब अत्यंत दयाळू, कृपाळू वगैरे होऊन माझ्यासारख्या माणसाच्या अज्ञानाची कीव करत मला तो विहित नमुना दाखवतात. ( का कुणास ठाऊक, पण मला दोन विहित नमुने दिसत असतात ! ) मग माझ्या डोक्यात प्रकाश पडतो. ' अच्छा ! असं आहे का ? द्या बरं मला तो विहित नमुना. मी आपल्याला भरून देतो. ' पुन्हा माझं अज्ञान प्रकट होतं. भाऊसाहेब पुन्हा कृपाळू वगैरे होऊन आणि प्रयत्नपूर्वक तोंडातील बार सांभाळून ( आता मी अज्ञानी आहे हे त्यांना माहित झालेलं असल्याने ) मला समोरच्या झेरॉक्सच्या दुकानाकडे बोट **क्रमशः**



## आनंदी पहाट

## कामातील आत्मिक आनंद द्विगुणित व्हावा

आधुनिक केसरी

आपल्या अंतर्मनाला आश्वस्त करणारी संरचना साकारताना अनेक विषयांचा आपण अभ्यासपूर्वक विचार करणं गरजेचं असतं. आपण कितीही म्हटलं तरीही निसर्गापासून फार काळ आपण दूर राहू शकत नाही. निसर्गाचं सौंदर्य आपल्या अंतर्मनाला सततच आनंद देत असतं. आपलं घर कोठेही असलं तरीही आपलं अंतर्मन



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

नैसर्गिकरित्या निसर्गाच्या जवळ जाऊ पाहात असतं. निसर्गातलं जे जे काही आपण पाहातो ते ते आपल्याला भावणारं असतं. विशेषतः निसर्गातल्या रंगांनी एक प्रकारे आपल्यावर जादूच केलेली असते. याचा विचार करून आपल्या घराच्या अंतर्गत सजावटीसाठी हरित आणि नैसर्गिक संरचना साकारणे देखील सुखद अनुभव देणारं असतं. अनेकदा गृह सजावट करताना केवळ खूप फर्निचर, अनेकविध रंगांचा वापर, भरपूर मोठी झगमगाट करणारी प्रकाशयोजना, नवनवीन सजावटीच्या किमती वस्तू यांचा वापर केला म्हणजे सुंदर गृह सजावट केली असं नाही. आत्मिक आनंद देऊ शकणारं केलेलं कामच आपण प्राधान्यक्रमानं स्वीकारलं पाहिजे. त्यासाठी कोणत्या प्रकारे ते केलं आहे त्या पेक्षाही कसं केलं आहे याला अधिक महत्व असतं. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संबंध त्या व्यक्तीच्या घरासाठी बनवलेल्या अंतर्गत संरचनेशी असतो. प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तिमत्वानुसार घराची अंतर्गत संरचना ठरत असते. त्यामध्ये त्या व्यक्तीच्या अपेक्षा, गरजा, आवडी निवडी, अंगभूत कलागुण, छंद, वैचारिक क्षमता, सामजिक स्थान, व्यावसायिक संबंध, कौटुंबिक आकार, शैक्षणिक पात्रता, आर्थिक कुवत तसेच याव्यतिरिक्त इतर सर्व लौकिक आणि अलौकिक गुण या सर्व बाबींवर घराची बाहय तसेच अंतर्गत संरचना आणि सजावट करण्याचं ठरवावं लागतं. एखाद्या घराची अंतर्गत संरचना संबंधित कुटुंबियांच्या प्रत्येकाचं व्यक्तिमत्व खुलवत असते. अशाप्रकारे सजवलेलं घर एकूणच वातावरणात ऐट अणू शकतं.



आधुनिक केसरी

**संतांचे वागणे | हितकारी ||**

मंगळ करता | अमंगळची होय ||
घडे कैसे माय | अघटीत ? ||१||
दोरी भासे सर्प | भ्रमाचा हा खेळ ||
मनाचे हे खूळ | भासमय ||२||
अजाणतेपणी | घडे अपराध ||
करते सावध | गुरू कृपा ||३||
अज्ञानाचे डोई | भीतीचे सावट ||
तमाचा शेवट | ज्ञान करी ||४||
हिताचे बोलणे | श्रद्धाळू जगणे ||
संतांचे वागणे | हितकारी ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## श्री संत बंका अभंगवाणी

आधुनिक केसरी

'चोखा चोखट निर्मळ। तया अंगी नाही मळ।।
चोखा प्रेमाचा सागर। चोखा भक्तीचा आगर।।
चोखा प्रेमाची माउली। चोखा कृपेची साऊली।।
चोखा मनाचे मोहन। बंका घाली लोटांगण।।

## निरासक्ती आणि शरणागती



आधुनिक केसरी

एखाद्याची सुरी असली, तिची लाकडी मूठ बदलून लोखंडाची केली; दुसऱ्याने चांदीची केली, कुणी सोन्याची केली; पण मारल्यानंतर परिणाम एकच ! तसा, प्रपंच चांगला असला, कसाही असला, तरी तो सुरीच आहे, त्याचा घात सगळीकडे सारखाच ! प्रपंचाची आसक्ति म्हणजे सुरीची धार आहे. म्हणून, आपला धंदा, नोकरी, सगळे उत्तम करावे,त्यात मागेपुढे पाहू नये; पण त्यासाठी मी आहे असे नाही समजू कधी. नोकरी ही सुखाकरिता नसून पोट भरण्यासाठी आहे अशा वृत्तीने जो ती करील त्याला तिची आसक्ति आणि अभिमान राहणार नाही. सावधगिरीने वागावे, भगवंताचे स्मरण ठेवावे, त्याचे नाम घ्यावे; बाकीच्या सगळ्या गोष्टी प्रारब्धावर ठेवाव्या. यानेच समाधान मिळेल. भगवंताशिवाय समाधान मिळणे शक्य नाही. 'मी समाधान राखून चाललो' असे म्हणणारा, तो जगात धन्य आहे खरा ! ही धन्यता यायला भगवंताची अत्यंत आवश्यकता आहे. रामाच्या इच्छेने सर्व चालले आहे, राम कर्ता आहे, ही भावना ठेवून आपण प्रपंच करू या. प्रयत्न आटोकाट करावा, पण फळ देणारा भगवंत आहे ही भावना ठेवून समाधान टिकवावे.

भगवंताची प्राप्ति व्हायला दुसरे काही नको, शरणागती पाहिजे. मी उपाधिरहित बनणे ही शरणागती आहे. माझेपणाची जी उपाधी आहे ती नाहीशी करायची असेल तर साधन तसेच पाहिजे. इतके उपाधीरहित साधन नामाशिवाय दुसरे कोणतेही नाही. ते साधन तुम्ही करा. भगवंताच्या नामाचे प्रेम यायचे असेल तर अंतःकरण शुद्ध पाहिजे. अंतःकरण द्वेषाने, मत्सराने, अभिमानाने भरलेले असू नये. एकमेकांवर प्रेम करा, घरातून सुरुवात करा. मुलगा आपल्याला सुख देतो म्हणून नाही, पण माझे कर्तव्य म्हणून मी त्याच्यावर प्रेम करीन. निःस्वार्थीपणाने प्रेम करणे हाच परमार्थ आहे खरा. त्यासाठी, राम दाता आहे, पाठीराखा भगवंत आहे, ही जाणीव ठेवून तुम्ही रहा. ही जाणीव निर्माण करण्याकरिता भगवंताच्या नामाची खरी गरज आहे. मनाची शांति मिळवायला हाच मार्ग आहे. दैन्यवाणे कधीच नसावे. अगदी राजाचे वैभव तुम्ही भोगा, पण त्या वैभवाने मी सुखी आहे असे न म्हणता, मी रामाचा आहे म्हणून सुखी आहे ही भावना ठेवून वागा. वैभव आज आहे, उद्या नाही; वैभवावर विश्वास ठेवू नका. मी रामाचा आहे या भावनेत तुम्ही रहा. त्यासाठी रामाचे नाम तुम्ही घ्या, राम कल्याण करील हा माझा भरवसा तुम्ही ठेवा. **आजचे बोधवचन आहे** - सुख कशात आहे ? सुख हे समजुतीमध्ये आहे, आणि भगवंताचे होणे ही समजूत तेवढीच खरी आहे.

## मनाचे श्लोक

आधुनिक केसरी

**करी वृत्ती जो संत तो संत जाणा।**
**दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।**
**उपाधी देहबुधिते वाढविते।**
**परी सज्जना केवि बांधू शके ते।।१६८।।**

**श्लोकार्थ :** आपल्या मनाला सर्वार्थाने जो आत्ममय करतो तोच संत होय. त्याच्या अंतरी आत्मस्वरूपाहून अन्य वासनाच नसते. त्यामुळे तो मस्त असतो. प्रपंचाचा पसारा देहबुद्धीला वाढवतो हे खरे. पण संताला त्याची बाधा होत नाही.

**विवेचन :** मागील पाच श्लोकांत सज्जनांची संगत धरावी असे सांगितले आहे. जीवाचा प्रवास मनुष्याकडून मनुष्याकडे, मनुष्याकडून पशुत्वाकडे किंवा मनुष्याकडून संतंत्वाकडे होत असते. अर्थात हा प्रवास करणे अथवा न करणे हे सर्वस्वी मनुष्याच्या हातात असते. मनुष्याने प्रयत्न सुरू केले की त्याला मार्गदर्शन करणारा ( गुरू ) कोणीतरी भेटतोच. ज्याने सर्व इंद्रियांवर विजय मिळविला आहे, जो पूर्णपणे देहातीत झाला आहे, तोच खरा गुरू होऊ शकतो.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

जसे चित्राची पारख करायला चित्रकलेची थोडीफार माहिती असणे गरजेचे असते, तसेच सद्‌गुरू ओळखण्यासाठी गुरूंचे काही गुण आपल्या अंगी असणे गरजेचे असते. संत ओळखण्यासाठी अगदी साधी कसोटी श्रीगोंदवलेकर महाराज यांनी सांगितली आहे. जिथे जाऊन आपल्याला काहीही महावेसे वाटत नाही, ते संतांचे स्थान आहे असे ओळखावे. दासबोधात समर्थांनी संतांची अनेक वैशिष्ट्ये सांगितली आहेत. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले" असे आपल्याकडे संतांचे वर्णन केले गेले आहे आणि ते पूर्णपणे खरे आहे. आतापर्यंत होऊन गेलेल्या संतांची चरित्रे अभ्यासली तर असे लक्षात येते की त्यांची संपूर्ण चरित्र हे पारदर्शक आहे. संत जे बोलतात तसे वागतात. याउलट सामान्य मनुष्य वागतो. सामान्य माणूस बोलतो संतांसारखे पण कृती मात्र बोलण्याचा एकदम उलट करतो. तो परमार्थ करण्याचा प्रयत्न करतो, परंतु देहबुद्धिपुढे संपूर्ण शरण जातो. आपला लौकिक राखण्याची सामान्य मनुष्याची धडपड चालू असते, परंतु ही धडपड, त्यासाठी लागणारी उपाधी, त्याला खरे सुख मिळू देत नाही.



काही वर्षांपूर्वी भारताने मंगळ ग्रहावर यान पाठविले. जेंव्हा असे उपग्रह किंवा याने अवकाशात प्रक्षेपीत केली जातात तेंव्हा पृथ्वीच्या कक्षेतून बाहेर पडे पर्यंत भरपूर ऊर्जा द्यावी लागते, परंतु एकदा का ते पृथ्वीच्या गुरूत्वाकर्षण कक्षेच्या बाहेर पडले की पृथ्वीचे गुरुत्वाकर्षणादी नियम त्यास लागू होत नाही आणि नंतर फारशी उर्जाही लागत नाही. मग ते दिलेल्या कक्षेत आपसुक फिरत राहते. संत सुद्धा या उपग्रहांप्रमाणे मनानी ह्या नश्वर जगातून ( संसारातून ) बाहेर पडून मुक्त झाले असतात. त्यामुळे जगातील सर्व घडामोडींचा त्यांच्यावर कोणताही बरा वाईट परिणाम होत नाही. सध्या एक संवाद प्रसिद्ध आहे. *डर के आगे जीत है! याच न्यायाने उपाधींच्या पुढे ( उपाधी पूर्णपणे टाकून दिली, देहबुद्धी समूळ नष्ट झाली की... ) भगवंताची प्राप्ती आहे. एकनाथी भागवत ग्रंथात एकनाथ महाराज म्हणतात, "निरपेक्ष जो माझा भक्त । जो मजसमान समर्थ । हेंही बोलणें अहाच येथ । तो मीचि निश्चित चिद्‌रूपें ॥ ( २०/४१५ ) ( अर्थः- माझा जो भक्त निरपेक्ष असतो, तो माझ्यासारखाच समर्थ असतो. पण हे बोलणेसुद्धा औपचारिकच आहे. कारण, तो चिद्रूपत्वाने खरोखर मीच असतो. )

# पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्रदान नोंदणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई चे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त 1 जानेवारी रोजी नेत्रदान नोंदणी शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाड्यातील सर्वाधिक पत्रकार व पत्रकार प्रेमी नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून नेत्रदान नोंदणी शिबीर यशस्वी करावे, असे आवाहन पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे. नेत्रदान नोंदणी महाशिबीर संपूर्ण राज्यभरात आयोजित करण्यात आले आहे. पत्रकार संघाच्या वतीने महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात शहरामध्ये नेत्रदान नोंदणी शिबीर राबवण्यात येणार आहे. विहित नमुन्यातील नोंदणी फॉर्म इच्छुक नेत्रदान दात्याने भरुन समवेत स्वतःच्या आधार कार्डची झेरॉक्स द्यायची आहे. बीड जिल्ह्यातील पत्रकार आणि पत्रकार प्रेमी जनतेने पत्रकार संघाच्या विभागीय कार्यालयात सम्राट चौक, शाहूनगर कॉर्नर, बीड येथे विहित नमुन्यातील फॉर्म आणि आधार कार्ड 1 जानेवारी पर्यंत जमा करावेत असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी यांनी केले आहे.

**बीड जिल्ह्यातील नवनिर्वाचित सरपंच, सदस्यांचा सत्कार** : बीड जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये ग्रामीण भागातील ज्या पत्रकारांनी अथवा वृत्तपत्र सृष्टीशी निगडीत विविध घटकामध्ये काम करणारे प्रतिनिधी यांनी सहभाग घेऊन जर सरपंचपदी अथवा ग्रामपंचायत सदस्य म्हणून विजयी झाले असतील अशा बहाद्दर नवनिर्वाचित सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी 9822628521 या व्हॉटसअॅप नंबर वर आपली व्यक्तीगत माहिती ( वृत्तपत्र, निवडून आलेले गाव, संपूर्ण नाव ) पाठवावी . पत्रकारीतेतुन थेट सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्य झालेल्या नवनिर्वाचित सदस्यांचा पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यात यथोचित सत्कार करुन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे .



# शस्त्रसाठा, ३०० कोटींच्या ड्रग्जसह पाकिस्तानी बोट पकडली

## भारतीय तटरक्षक दलाची मोठी कारवाई

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** भारतीय तटरक्षक (आयसीजी) दलास एका कारवाईत मोठे यश आले आहे. शस्त्रसाठा, स्फोटके आणि तब्बल ३०० कोटींची ४० किलो अंमलीपदार्थ घेऊन जाणारी दहा जणांसह असेलेली एक पाकिस्तानी बोट आज(सकाळी) गुजरात किनाऱ्यावर पकडली आहे. गुजरात दहशतवाद विरोधी पथकास मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे तटरक्षक दलाने २५ आणि २६ डिसेंबर रोजी रात्री आंतरराष्ट्रीय समुद्री सीमा रेषा(आयएमबीएल) क्षेत्रात पाळत ठेवण्यासाठी 'ICGS Arinjay' हे जलद गस्त जहाज तैनात केले आहे. आयसीजीकडून प्राप्त माहितीनुसार पहाटे पाकिस्तनची मासे पकडणारी अल सोहेली नावाची एक बोट भारतीय समुद्री हद्दीत संशियीतरित्या फिरताना आढळून आली. आयसीजीने त्यांना हटकल्यानंतरही दिल्यानंतरही बोटीवरील चालकांकडून जाणुनबुजून दुर्लक्ष करण्यात आले. यानंतर आयसीजीने त्यांना इशारा देण्यासाठी गोळीबारही केला, परंतु तरीही ती बोट थांबली नाही. यानंतर आयसीजीच्या जवानांनी ती बोट पकडली आणि चालक दलासह सर्वांना ओखा बंदरावर आणले. मागील १८ महिन्यांमध्ये गुजरात एटीएस आणि आयसीजीचे हे सातवे संयुक्त अभियान आहे. तर ड्रग्ससह मोठ्याप्रमाणावर शस्त्रसाठा आणि स्फोटके जप्त करण्यात आल्याची ही पहिली घटना आहे.

# दारुच्या प्रोजेक्टचा एवढा काय पुळका आलाय सरकारला

## मेगा प्रकल्प नगरमध्ये आणि जमीन रत्नागिरीत ; शिंदेसरकारच्या या अजब उद्योगाची अजित पवारांकडून पोलखोल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** मेगा प्रकल्पाची मान्यता मिळवण्यासाठी नगर जिल्हयात प्रकल्प आणि जमीन रत्नागिरी जिल्ह्यात अशा प्रकल्पाची मान्यता दिलेल्या शिंदेसरकारच्या या अजब उद्योगाची पोलखोल विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी स्थगन प्रस्तावाद्वारे समोर आणली. महाराष्ट्रात वेगवेगळे प्रकल्प येण्यासाठी मेगा प्रकल्प म्हणून काही सवलती, प्रोत्साहन सरकार देते तो संपूर्ण अधिकार एचपीसी आणि सीएससी या समित्यांना असते. यामध्ये करोडो रुपयांचे राज्याचे नुकसान झाले आहे. वास्तविक अशाप्रकारचे नुकसान करण्याचा अधिकार हा सरकारला आहे का? असा सवालही अजित पवार यांनी केला आहे.

नगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील टिळकनगर इंडस्ट्री ही डहाणूकर नावाचे मालक असून त्यांचा हा मद्य उत्पादक प्रकल्प आहे. त्यांनी त्यामध्ये २१० कोटीची गुंतवणूक केली. मुळात २५० कोटीची गुंतवणूक असल्याशिवाय मेगा प्रकल्पांना मान्यता देता येत नाही. विशेष म्हणजे तिथे 'डी' झोन आहे. तर रत्नागिरी जिल्ह्यात चिपळूण तालुक्यात झोन 'सी' आहे. या कंपनीने तिथे ८२ कोटीची जमीन घेतली. म्हणजे २१० चा प्रकल्प नगर जिल्हयात आणि रत्नागिरीत ८२ कोटीची जमीन दाखवली असा २९२ कोटीचा प्रकल्प कागदोपत्री दाखवला आणि त्याला २५० कोटी रुपयांचा मेगा प्रकल्प म्हणून सबसिडी मिळवण्याचा प्रयत्न केला आणि याला मान्यता देण्यात आलेली आहे असा गौप्यस्फोटही अजित पवार यांनी केला. वास्तविक पाहता असे झाले तर उपमुख्यमंत्री महोदय महाराष्ट्रात वेगवेगळ्या भागात प्रकल्प होत आहेत ते प्रकल्प मागासलेल्या भागात असतील आणि त्यांना २५० चा आकडा गाठण्यासाठी ५०-१०० कोटी कमी पडत असतील तर ते दुसरीकडे जमीनी घेतील आणि सरकारच्या सवलतीचा फायदा घेतील याची आठवणही पवार यांनी करुन देताना अध्यक्ष महोदय हे काय चालले... कुणाकरीता, कशासाठी चालले आहे, असा संतप्त सवालही केला.यापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी उपसमितीत अशा प्रकल्पांना मान्यता नाकारली होती. असे प्रकल्प कुणालातरी डोळ्यासमोर ठेवून मान्य करायला लागलो तर राज्यसरकारचे करोडो रुपये नुकसान होईल आणि हे राज्याच्या बजेटमधून द्यावे लागतात हेही अजित पवार यांनी निदर्शनास आणून दिले. कुठला प्रकल्प देताय तर दारू उत्पादनाचा... दारुच्या प्रोजेक्टचा एवढा काय पुळका आलाय सरकारला... एवढी मदत करायची काय गरज होती... अध्यक्ष महोदय ही जी खिरापत दिली त्यामुळे १३ कोटी जनतेचे नुकसान या सरकारने केले आहे असेही अजित पवार म्हणाले.

# रेल नावडी गावाला बस सुरू करण्यासाठी कन्नड आगारप्रमुखांना साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील रेल व नावडी या गावातील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण घेण्यासाठी रोज कन्नडला ये-जा करावी लागत आहे परंतु त्यांना वाहन नसल्यामुळे बऱ्याचशा वेळेस शैक्षणिक बाबींमध्ये नाहक अडथळा निर्माण होत आहे. शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी आमच्या गावातील शंभर ते सव्वाशे विद्यार्थ्यांसाठी बसची व्यवस्था करावी असे निवेदन आगारप्रमुखाला देण्यात आले असून आमच्या रेल नावडी गावातील शंभर ते सव्वाशे विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. आमचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी वेळेत पोहचण्यासाठी दररोज सकाळी ८:00 नावडी वरून व दुपारी ५:०० वाजता कन्नड वरून बसची आवश्यकता आहे. याकडे आगार प्रमुख लक्ष देणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी रोहीणी बागुल, विठ्ठल बागुल, आकांशा बागुल, प्रियंका मुरकुंड, योगेश मगर, हार्षल आढाव, विकास मगर, रोहित आढाव, रुखमन आढाव, भारती आढाव, ज्ञानेश्वर आठाव, पूजा आठाव, आढाव नवनाथ, विमल मुरकुंडे, स्वाती चाकूळे, किरण वाकळे इत्यादी विद्यार्थ्यांनी यांच्या निवेदनावर सह्या आहेत.

# भारत जोडो यात्रेवर गुप्तचर विभागाची नजर

## काँग्रेसचा मोदी सरकारवर खळबळजनक आरोप



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधींच्या नेतृत्वात सुरु असलेली 'भारत जोडो' यात्रा दिल्लीत पोहचली आहे. ८ दिवस यात्रा स्थगित करण्यात आली आहे. १२० दिवसांत ३ हजार ५७० किलोमीटरचा प्रवास 'भारत जोडो' यात्रेने पार केला आहे. त्यात काँग्रेसकडून केंद्रातील मोदी सरकारवर खळबळजनक आरोप करण्यात आला आहे. 'भारत जोडो' यात्रेवर नजर ठेवण्यासाठी गुप्तचर यंत्रणेचा वापर केंद्र सरकार करत आहे, असे काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी म्हटले आहे. भारत जोडो यात्रेला बदनाम करण्यासाठी केंद्र सरकार घटनात्मक आणि कायदेशीर मार्गाचा अवलंब करत आहे. यात्रेत लहान मुलांचा वापर करण्यात आला म्हणून निवडणूक आयोग आणि केंद्रीय बाल हक्क आयोगाने काँग्रेसला नोटीस बजावल्या. पण, पंतप्रधान मोदींनी गुजरात विधानसभेच्या प्रचारात लहान मुलीचा वापर केला. याबद्दल आम्ही निवडणूक आयोग आणि बाल हक्क आयोगाला माहिती दिली असताना कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, असे जयराम रमेश यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. काही दिवसांपूर्वी यात्रा हरयाणात असताना लोकांच्या विश्रांतीसाठी असलेल्या कंटेरनरमध्ये सरकारचे अधिकारी आढळून आले. त्यांना विचारण्यात आल्यावर स्वच्छतागृहाचा वापर करण्यासाठी आलो, असल्याचे सांगण्यात आले. हे अधिकारी हरयाणा सरकारच्या गुप्तचर विभागाचे असल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे, असे जयराम रमेश म्हणाले. तिथे डबल इंजिन सरकार असल्याने, वरून आदेश आल्यानंतरच ही पडताळणी झाली असेल. याबाबत सोहना पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. आमच्याजवळ लपवण्यासारखं काही नाही, असेही जयराम रमेश यांनी स्पष्ट केलं.



# अनिल देशमुखांना दिलासा

आधुनिक केसरी

१०० कोटी रुपयांच्या वसुली प्रकरणात तुरुंगात असलेले राज्याचे माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा कारागृहाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनिल देशमुखांच्या जामिनाच्या स्थगितीला मुदत वाढवून देण्याची केंद्रीय अन्वेषण विभागाची ( सीबीआय ) मागणी उच्च न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे अनिल देशमुख यांची उद्या ( २८ नोव्हेंबर ) कारागृहातून सुटका होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई उच्च न्यायालयाडून अनिल देशमुखांना जामीन मंजूर करण्यात आला होता. पण, सीबीआयला या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देता यावे यासाठी देशमुखांच्या सुटकेच्या आदेशाची दहा दिवस अंमलबजावणी न करण्याचे न्यायालयाने स्पष्ट केले होते. दरम्यान, देशमुखांच्या सुटकेच्या आदेशाला देण्यात आलेल्या स्थगितीची मुदत आज ( २७ नोव्हेंबर) संपणार होती. याप्रकरणी आज मुंबई उच्च न्यायालयात तातडीची सुनावणी पार पडली. तेव्हा सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होईपर्यंत अनिल देशमुखांच्या जामिनावरची स्थगिती वाढवण्यात यावी, अशी मागणी सीबीआयच्या वतीने उच्च न्यायालयात करण्यात आली. मात्र, सीबीआयची ही मागणी उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. त्यामुळे उद्याच अनिल देशमुखांची ऑर्थर रोड कारागृहातून सुटका होणार असल्याचं सांगण्यात येत आहे. न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या एकलपीठाने अनिल देशमुखांना जामीन मंजूर केला होता. एका लाख रुपयांच्या बंधपत्रावर सुटका करण्याचे आदेश देताना न्यायालयाने काही अटी घातल्या होता. देशमुख यांनी आरोग्याच्या कारणास्तवही जामिनाची मागणी केली होती. मुंबईतील १७५० ऑर्केस्ट्रा बार/पबमधून प्रत्येकी तीन लाख या प्रमाणे अंदाजे ४० ते ५० कोटी गोळा करण्यास सचिन वाझे यांना देशमुख यांनी सांगितले. त्यानुसार वाझे यांनी त्यापैकी चार कोटी ७० लाख रुपये गोळा करून देशमुख यांच्याकडे सुपूर्द करण्यासाठी कुंदन शिंदे याच्याकडे दिले, असा देशमुख यांच्यावर आरोप आहे. १०० कोटींच्या कथित वसुली प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने देशमुख यांना २ नोव्हेंबर २०२१ मध्ये अटक केली. त्यानंतर बदल्या व नियुक्त्यांसाठी पैसे घेतल्याच्या प्रकरणात सीबीआयने ६ एप्रिल २०२२ रोजी त्यांना अटक केली. २ जून २०२२ रोजी एका प्रकरणात सीबीआयने आरोपपत्र दाखल केले आहे. आणखी दोन प्रकरणात आरोपपत्र दाखल झालेले नाही. तेव्हापासून अनिल देशमुख कारागृहात आहेत.



डॉ. वि. ल. धारुरकर
संपर्क क्र. 9225313592

# माझा मराठाचि बोलूकौतुके ।

आधुनिक केसरी


**संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी मराठी भाषेबद्दल अभिमानाने असे म्हटले आहे की, " माझा मराठीची बोलू कौतुके । परि अमृतातेही पैजासी जिंके । अशी अक्षरे रसिके मिळवीन ।। (ज्ञानेश्वरी अध्याय, ६:१३) याचा अर्थ असा की, माझे हे प्रतिपादन मराठी भाषेमध्ये आहे खरे ; परंतु लिलयने अमृताला ही प्रतीक्षापूर्वक जिंकेल अशा तऱ्हेची रसाळ शब्दरचना मी निश्चितपणे करीन. हा ज्ञानेश्वराचा विश्वास सार्थ करण्याचे कार्य महाराष्ट्रात अनेक संत आणि विद्वान मंडळी करत आहे.**

मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील हे अशा संत जनाच्या मांदियाळी पैकी एक आहेत. त्यांना २१ डिसेंबर रोजी ८१ वर्षे पूर्ण होत आहेत आणि म्हणून मराठी भाषा व साहित्याच्या प्रचारासाठी एम.जी.एम विद्यापीठाव्दारे 'मराठवाडा भूषण' हा पुरस्कार देऊन त्यांचा यथार्थ गौरव केला आहे. संत ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे,

**हे ज्ञानाची पवित्रता । ज्ञानींची अथी ।**
**जरी अमृताची । चवी निवडीजे ।। ( ज्ञानेश्वरांनी अध्याय, ४ :८० )**

पुन्हा पुन्हा निर्देश करून पाहिले असता असे जाणवते की, ज्ञानाची पवित्रता फक्त ज्ञानाच्या ठिकाणी आहे. अमृताची चव कशी असे विचारले तर अमृता सारखीच म्हणावी लागेल. तशी ज्ञानाला ज्ञानाचीच उपमा देणे योग्य आहे. हे सुवर्णतत्व घेऊन कौतिकराव ठाले पाटील यांनी आपल्या आयुष्यात सातत्याने विवेकाची पूजा बांधून ज्ञानाची भक्ती केली आहे. त्यांचे समग्र जीवन कार्य हे ज्ञानामृताचा वर्षाव करणारे आहे.

गोदाकाठचा अगस्ती ऋषी मराठवाडा प्रदेशाला दंडकारण्य किंवा तपोभूमी म्हटले जाते. या भूमीत अगस्तीऋषी, कपिल मुनी, गौतम ऋषी इत्यादींनी वास्तव्य केले, त्यांची आश्रमाची जागा आज ही गोदाकाठी दाखविली जाते. प्रभू रामचंद्र व अगस्तीऋषी यांच्या भेटीचा संदर्भ 'नवगण महात्मे ' या पोथी मध्ये आला आहे. तसेच मराठवाडा प्रदेशात स्वामी चक्रधर (प्रतिष्टान), मुकुंदराज (अंबेजोगाई), संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर (आपेगाव), संत नामदेव (नरसी) , संत एकनाथ (पैठण व देवगिरी ), म्ह्दंबा (पैठण), जनाबाई ( गंगाखेड ), मुक्ताई (पैठण) तसेच समर्थ रामदास (जांब), संत विसोबा (औंढा), संत गोरोबा (तेर) इत्यादी संतांनी संचार केला. वीरशैव पंथाचे संत बसवेश्वर यांनी ही मराठवाड्यात धाराशिव, लातूर व बीड या भागात संचार केला. त्यांच्या पावन स्पर्शामुळे मराठवाड्यात संत साहित्याचा आविष्कार झाला. 'इये मराठीचिये नगरी ब्रह्मविद्याचा सुकाळू' असे म्हटले जाते. या संतभूमीत १७२९ ते १९४८ पर्यंत निजामाचे राज्य होते. त्यावेळी मराठी भाषा आणि संस्कृतीची मोठी कोंडी झाली होती. तथापि, संताच्या जागरणामुळे या प्रदेशात पुन्हा एकदा साहित्याची ललकारी ऐकू आली. विशेषता १९३४ नंतर महाराष्ट्र परिषदांची तुतारी फुंकण्यात आली आणि औरंगाबाद समाचार, निजाम विजय, मराठवाडा इत्यादी पत्र सुरू झाली. त्यातही आनंद कृष्ण वाघमारे, अनंतराव भालेराव यांच्या मराठवाडा साप्ताहिकाने कला, साहित्य व संस्कृती या क्षेत्रात मोठी जागृती घडवून आणली. उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. ना. गो नांदापूरकर, भालचंद्र महाराज कहाळेकर, रा. ब. मांढेकर आदींनी प्रयत्नपूर्वक मराठवाडा साहित्य परिषदेची स्थापना केली. वाघमारे व भालेराव यांचे त्यांना मार्गदर्शन होते. १९५६ नंतर मराठवाडा साहित्य परिषदेचे केंद्र औरंगाबाद हे बनले. तेव्हा आरंभीच्या काळात अनेक अडचणी होत्या. मराठी भाषेच्या व साहित्याच्या विकासासाठी मराठवाडा साहित्य परिषदेचे मुखपत्र म्हणून 'प्रतिष्ठान' हे मासिक कार्य करू लागले. मराठवाडा साहित्य परिषदेच्या उभारणीस उत्कर्षाचा काळ आला तो म्हणजे मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेनंतर, मराठवाडा साहित्य



परिषदेने आरंभीच्या काळात प्राचार्य म. भि. चिटणीस, प्रा. वा. ल कुलकर्णी, प्रा. ल. बा. रायमाने, अनंत भालेराव इत्यादींनी साहित्य परिषदेच्या उपक्रमांना गती दिली.

निजामाच्या राजवटीत उर्दूच्या प्रभावामुळे मराठी भाषेची कोंडी होत होती. त्यामुळे या प्रदेशातील कला, साहित्य व संस्कृतीच्या विकासासाठी २३ ऑगस्ट १९५७ रोजी मराठवाडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले. त्याबरोबरच पहिल्या तीन विभागापैकी मराठी भाषा व साहित्य हा विभाग होता आणि प्रा.वा.ल.कुलकर्णी हे मुंबईच्या विल्सन महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक होते. पहिल्या श्रेणीतील समीक्षक म्हणून त्यांचा दबदबा होता. ते मराठी विभागाचे पहिले प्राध्यापक व विभाग प्रमुख होते. या विभागात पुढे डॉ. यु.म. पठाण, डॉ. सुधीर रसाळ हे ही अध्यापनाचे कार्य करू लागले. या विभागातील पहिल्या पिढीतील विद्यार्थ्यांमध्ये रा. रं. बोराडे, कौतिकराव ठाले पाटील यांचा ही समावेश होता. महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाचा मराठी विभाग म्हणून या विभागातील प्राध्यापकांनी नावलौकिक निर्माण केला होता. अगस्त ऋषीच्या आश्रमाप्रमाणे अध्ययन, अध्यापन व संशोधनाचे कार्य सुरू झाले होते. ' इवलेसे रोप लाविले द्वारी । त्याचा वेलू गेला गगनावरी' ।। या संत वचनाप्रमाणे वाढत गेले. आणि मराठी भाषेचा मोगरा फुलत गेला.

तमसो मा ज्योतिर्गमय 'ज्योतीने अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करावी' या वचनाप्रमाणे कौतिकराव ठाले पाटील यांनीही अंधारातून प्रकाशाकडे प्रेरणादायी वाटचाल केली. त्यांचा जन्म औरंगाबाद जिल्ह्याच्या भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव येथे २१ डिसेंबर १९४१ रोजी शेतकरी व कष्टकरी कुटुंबात झाला. भोकरदन जवळ काही जुनी लेणी व मंदिरे आहेत. सातवाहन काळात तेथे मोठी बाजारपेठ होती. भोकरदनच्या कारागिरांनी सांचीच्या स्तुपावर कोरीव काम केल्याचा उल्लेख सांचीच्या शिलालेखात सापडतो. पिंपळगाव हे तसे दोन अडीशे वस्तीचे छोटेसे गाव. हे गाव मोठ्या महानगरापासून मैलोगंती लांब होते. या परिसरात प्रगत शिक्षणाचा मोठा अभाव होता. तुटपूज्या सोयी- सुविधा, साधन सामुग्रीची कमतरता, दुर्भीष, अज्ञान व अंधकाराचा प्रभाव यातून वाट काढत कौतिकरावाना कमालीचा शैक्षणिक संघर्ष करावा लागला. चौथ्या वर्गापर्यंतचे शिक्षण त्यांना गावातील मराठी शाळेतच घ्यावे लागले. पुढील शिक्षणासाठी त्यांनी तालुक्याचे गाव भोकरदन गाठले. पुढे शालेय शिक्षणासाठी त्यांनी औरंगाबादचा मार्ग धरला आणि देवगिरी महाविद्यालयात बी. ए. पर्यतचे शिक्षण घेतले. तेथेच त्यांना प्राध्यापक द.मा मिरासदार, प्रा. ल. भा. भिंगारे इत्यादींचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. त्यामुळे त्यातूनच ते साहित्याचे वाचन, मनन, चिंतन व लेखन यामध्ये जीवन अभिरुची संपन्न करू शकले. पुढे त्यांनी मराठी भाषा व साहित्यात आवड व रुची असल्याने विद्यापीठात एम.ए.मराठी पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागाचे नेतृत्व ख्यातनाम समीक्षक प्राध्यापक वा. ल. कुलकर्णी यांच्याकडे होते. कौतिकराव ठाले पाटील यांची जडणघडण वा.ल. यांच्या तालमीत झाली. स्वतः ठाले सर सांगतात की, वा. ल. म्हणजे 'हिरवी मिरची त्यांचा तिखट स्वभाव व कडक शिस्तीने एक पिढीच घडून आली'. वा. ल. यांचे मराठी व इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व अलौकिक व अद्भुत असेच होते. त्यांच्या विश्लेषणात तेजस्वी आणि विलक्षण धार होती. 'वाङःमयीन टीका आणि टिपणी' वा.ल. सरांच्या या ग्रंथाचा ठाले सर वारंवार उल्लेख करतात. एम.ए.ला शिकत असताना काव्यशास्त्राचे अध्यापक डॉ. सुधीर रसाळ व संत साहित्याचे गाढे अभ्यासक डॉ. यु. म. पठाण यांच्या संशोधन व अध्यापन शैलीचा प्रभाव कौतिकरावांवर पडला. विशेषता त्यांची आपल्या अध्यापनाची हातोटी आणि समीक्षेचे मापदंड वापरण्याची कसोटी यावर प्राध्यापक वा.ल.कुलकर्णी यांचा विशेष प्रभाव दिसून येतो. अखंड वाचन, सातत्यपूर्ण मनन व चिंतन आणि मौलिक लेखन ही वा.ल यांची पठडी ठाले सरांनी टिकून ठेवली आहे.

उमरगा ते धारुर प्रा. कौतिकराव ठाले पाटील यांनी आपल्या अधिव्ख्याता म्हणून सेवेची सुरुवात उमरगा येथील भारत शिक्षण संस्थेच्च छ. शिवाजी महाविद्यालय येथून केली. देवीशिंग चौहाण गुरुजी हे हैद्राबाद संस्थातील पहिले शिक्षणमंत्री होते. स्वामीजींच्या प्रेरणेने त्यांनी १९५५ साली उस्मानिया विद्यापीठाचे सलग्नीकरण घेऊन हे महाविद्यालय स्थापन केले होते. तेथील दहा प्राध्यापक पुढे प्राचार्य झाले. त्यापैकी प्राचार्य ठाले सर एक आहेत. १९७० ते १९७३ या चार वर्षाच्या काळात त्यांचा विद्यार्थी होण्याचे भाग्य मला लाभले. त्या काळात आम्हाला प्रा. डॉ. गोपाळ मोहोळकर, प्रा. वसंत कुसुरकर तसेच प्रा. गो.ग मंठाळकर यांचे मार्गदर्शन लाभत असे. ठाले पाटील सर मराठी गद्य व पद्य हे दोन्ही विषय शिकवीत असत. त्यांच्या शिकविण्याची हतोटी कुशल व गतिमान असे. त्यांच्या आवाजातील चढ-उतार, आरोह-अवरोह आणि दाखले देण्याची पद्धत यामुळे विद्यार्थी तल्लीन होऊन जात. काही वेळा विज्ञान व वाणिज्य शाखेचे विद्यार्थी सुद्धा त्यांची व्याख्याने आवर्जून ऐकत असत. याच काळात मला वाचन व लेखनाची गोडी लागली, ती म्हणजे सरांच्या व्याख्यान व मार्गदर्शनामुळे. कित्येक वेळा ते स्वतः चांगली पुस्तके विद्यार्थ्यांना वाचायला ही देत असत. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, लोकहितवादी, राजर्षी छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर तसेच स्वा. सावरकर इत्यादींचे साहित्य वाचनाचा आग्रह ते धरत असायचे. एकदा मी बी.ए प्रथम वर्ष शिकताना महाविद्यालयात वकृत्व स्पर्धेत आयत्या वेळेच्या विषयावर मी आकस्मातपणे भाग घेतला. परीक्षक मंडळात ठाले सर प्रमुख होते. मी प्रथम वर्षाला शिकत असतानाही तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांपेक्षा हि अस्खलित मांडणी केली. म्हणून माझी पहिल्या क्रमांकाच्या पारितोषकासाठी निवड करण्यात आली होती. सरांच्या आशीर्वादाने मी नंतर वक्ता म्हणून कधीही मागे वळून पाहिले नाही. ठाले सर उमरग्याहून पुढे मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळात प्राध्यापक म्हणून निवडले गेले. त्यांनी मंडळातील गंगापूर, माजलगाव, धारूर इत्यादी महाविद्यालयात **क्रमशः**



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

# भीती नको, सतर्कता हवी !

आधुनिक केसरी

**राष्ट्रीय जीवनाशी निगडित आदर्शांशिवाय लोकशाही राजकारण शक्य नाही. संविधान रचणाऱ्यांनी संपूर्ण राजकारणाचे चित्र उभे केले आहे. संविधानात अनेक संस्था आहेत. त्याचा आदर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. संसदीय लोकशाहीमध्ये राजकीय विचारधारा पक्षांद्वारे व्यक्त केल्या जातात. निवडणुकीत एखाद्या पक्षाला किंवा गटाला बहुमत मिळते. त्यांना पाच वर्षे काम करण्याचा घटनात्मक अधिकार आहे. विरोधकांनी सरकारवर टीका करावी. विरोधकांना सरकारवर टीका करण्याचा अधिकार आहे, टीका वस्तुस्थितीदर्शक आणि जनहितासाठी प्रेरित असावी.. टीका ही वस्तुस्थितीदर्शक आणि जनहिताला चालना देणारी असावी. तथ्यहीन टीका वातावरण बिघडवते. यामुळे अनावश्यक तणाव निर्माण होतो.**

गेल्या दोन वर्षात ज्याने लोकांना घरात कोंडून ठेवले, ज्याने जगाचे अर्थचक्र थांबवले, लाखो लोकांना बेरोजगार केले, ज्याने शाळकरी मुलांना शाळाबाह्य बनवले, ज्याने हजारो नव्हे तर लाखो लोकांचा जीव घेतला तो पुन्हा आलाय. हो कोरोना पुन्हा आलाय! दोन वर्षांपूर्वी ज्या देशात त्याचा उगम झाला त्याच देशात त्याने पुन्हा दमदार एन्ट्री केली आहे. कोरोनाच्या नव्या व्हेरियंटने चीनमध्ये धुमाकूळ माजवला आहे. कोरोनाच्या नव्या व्हेरिअंटने केवळ चीनचीच नव्हे तर जगाची चिंता वाढवली आहे. चीनमध्ये दररोज कोरोनाचे लाखो रुग्ण आढळून येत आहेत. बळींची संख्याही दररोज वाढत आहेत. दोन वर्षापूर्वीचे जे चित्र चीनमध्ये दिसत होते तसेच चित्र सध्या दिसत आहे. अर्थात चीनने कोरोनाचे आकडे लपवून झाला कायम फसवले आहे त्यामुळे चीनच्या सध्याच्या परिस्थितीवर अनेकजण शंका उपस्थित करत असले तरी केवळ चीनच नव्हे तर जपान, दक्षिण कोरिया, जर्मनी, अमेरिका, रशिया या देशातही या नव्या व्हेरियंटचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. या देशात देखील रुग्णांची वाढती संख्या धडकी भरवणारी आहे. जगाला हादरवणाऱ्या कोरोनाने पुन्हा दमदार एन्ट्री केल्याने तज्ज्ञांनिही चिंता व्यक्ती केली असून पुढील एक दोन महिन्यात कोरोनाची महासाथ येण्याची भीती व्यक्त केली आहे.



या सगळ्या परिस्थितीत भारताला काळजी वाटणे स्वाभाविकच आहे. कोरोनाच्या या नव्या व्हेरियंटच्या वाढत्या प्रादुर्भावाने सरकार सतर्क झाले आहे. पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळाची आणि अधिकाऱ्यांनी तातडीने बैठक घेऊन प्रशासनाला योग्य त्या सूचना दिल्या आहेत. प्रशासनही कामाला लागले आहे. आपले सरकार आणि प्रशासन नव्या संकटाला तोंड देण्यास सज्ज असल्याचे पाहून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आपल्या देशातील नव्वद टक्के नागरिकांचे लसीकारण पूर्ण झाले आहे ही समाधानाची बाब असली तरी वर्धक मात्रा अर्थात बूस्टर डोस घेणाऱ्यांची संख्या खूप कमी आहे त्यामुळे ज्या नागरिकांनी अद्याप बूस्टर डोस घेतला नसेल त्यांनी तो तातडीने घ्यायला हवा. बूस्टर डोस घेतलेल्या नागरिकांनी देखील निर्धास्त न राहता कोविड नियमांचे पालन करून सतर्कता बाळगावी. आपल्या देशात अजूनही कोरोनाच्या रुग्णांची संख्या नगण्य असली तरी नागरिकांनी कोरोनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. गर्दीच्या ठिकाणी मास्क लावायचाच हवा. राज्यातील काही देवस्थानांनी देखील भाविकांना मास्कसक्ती केली आहे. देवस्थान समितीचा हा निर्णय स्वागतार्ह आहे. परदेशातील विमानांनी येणाऱ्या प्रवाशांना विमानतळावर आरटीपीआरसी चाचणी बंधनकारक केली असली तरी परदेशातील विमानसेवा मात्र अजूनही चालू आहे. विदेशातून येणाऱ्या विमानांना सरकारने सरकारने तात्काळ बंदी घालावी. विदेशातून येणाऱ्या विमानांना बंदी घालण्यास उशीर केला तर त्याची मोठी किंमत आपल्याला मोजावी लागेल. कोरोनाच्या नव्या व्हेरीयंटला न घाबरता सतर्कता बाळगली तरी या नव्या संकटाशी देखील आपण यशस्वीपणे मुकाबला करू शकतो. भीती नको सतर्कता हवी !

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# मानवी मनाचे विश्लेषण करणारा लेखसंग्रह



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**मानवी मन ही या जगात सर्वात अनाकलनीय अशी गोष्ट आहे. जाणीव व बुद्धी यांच्यामुळे घडणाऱ्या ज्ञान, विचार, मत, स्मरणशक्ती, भावना, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, चेतना या गोष्टी ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणाला मन असे म्हणतात. या सर्व गोष्टी या मेंदूद्वारे होणाऱ्या प्रक्रिया आहेत. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये व तत्त्वज्ञानामध्ये मनाचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. मानवी मन हे डोळ्यांनी दिसत नसले तरी त्याचे अस्तित्व आपण अनुभवतो.**

शरीरात अनेक संस्था कार्यरत आहेत, ज्यामुळे शारीरिक कार्ये सुरळीत सुरु असतात. पण मन ही अशी जागा आहे, जिथे विचारांची निर्मिती होते, मानवी संवेदना, भावभावना इथे निर्माण होतात. मन हे असे वाहन आहे, ज्याद्वारे आपण कुठेही फिरून येऊ शकतो. कल्पनेच्या जगात रममाण होऊ शकतो. प्रेम, राग, लोभ, ईर्षा, मत्सर, मोह, वासना यांची मनात उत्पत्ती होत असते. या विचारांच्या साहाय्याने माणुस वर्तन करत असतो. मन हे चंचल असते. एकाच वेळी अनेकांगी विचारांची जंत्री सुरु असते.

या मनाची व्याप्ती इतकी मोठी आहे, की मानवी आयुष्याचे महत्त्व यावर अवलंबून आहे. या विशाल मनाची स्थिती, त्याचे महत्त्व विशद करणारे 'मनाचे श्लोक' समर्थ रामदास महाराजांनी लिहिले. मनाच्या संदर्भात अनेक वाक्य आपण ऐकली असतील, मनावर दडपण आले, मनावरचे ओझे हलके झाले. तसेच मन या संकल्पनेवर अनेक गाणी सुद्धा लिहिली गेली. एखादा कवी जेव्हा कविता लिहितो त्याआधी ती कवीच्या मनात स्फुरते.चित्रकार कैनवासवर चित्र रेखाटण्याआधी ते चित्र चित्रकाराच्या मनात रेखाटलेले असते. यावरून मनाचे कार्य किती महत्त्वाचे आहे, याची कल्पना आली असेलच.

याच मनाची ओळख, मनाची व्याप्ती आणि त्याचे मानवी जीवनातील महत्त्व सोप्या भाषेत सांगणारे पुस्तक वाचकांसाठी उपलब्ध झाले आहे. प्रा. डॉ. अशोक पाटील लिखित 'मनाच्या गाभाऱ्यात' हा लेखसंग्रह मानवी मन या संकल्पनेची व्याप्ती विशद करणारा आहे. पुस्तकाचे समर्पक शीर्षक पुस्तकाच्या विषयाची ओळख करून देणारे आहे. या पुस्तकात एकूण ११ लेखांचा समावेश असून प्रत्येक लेखातून मनाची सखोलता कळत जाते. हा विषय सखोल अभ्यासाचा विषय वाटत असला तरी प्रत्येक मनुष्याला समाधानकारक आयुष्य जगण्यासाठी उत्तम मार्गदर्शन करणारा हा विषय आहे. एका ठराविक वर्गासाठी हा विषय राहत नाही, तर हा विषय सर्वसमावेशक आहे.मनाची संकल्पना विशद करण्यासाठी लेखकाने विविध काव्य, सुविचार आणि संतांच्या रचनेचा सुयोग्य वापर केलेला आहे.

माणसाला फक्त निरोगी शरीर हवे असे नाही तर त्यासोबतचा मानसिक स्थैर्य , समाधान, आनंद, सुख हवे असते. पण ते आपोआप मिळते का ? नाही. त्यासाठी आपल्याला आपले मानसिक स्वास्थ्य जपणं गरजेचे असते. मानवी मनाची योग्य मशागत कशी करावी, याची माहिती अत्यंत सोप्या भाषेत, विविध उदाहरणांद्वारे लेखकाने पटवून दिले आहे. शारीरिक स्वास्थ्य जपण्यासाठी आपण व्यायाम करतो, तसेच मानसिक स्वास्थ्य जपण्यासाठी जे व्यायाम करणं आवश्यक आहे, याची संकल्पना, पद्धती यात नमूद केलेल्या आहेत. पुस्तकात सुरुवातीला मन म्हणजे क़ाय, मनाची व्याख्या सांगून मग मनाचे प्रकार आणि कार्ये, मनाशी संवाद कसा साधायचा, मनाचा वापर कसा करावा, मनाच्या विविध अवस्था, त्याचे स्वरूप , अंतर्मन आणि झोप, स्वप्ने, अंतर्मन आणि आरोग्य यांचा संबंध इत्यादी अनेक विषयांची मांडणी यात अनुभवायला मिळते.

हल्लीच्या धकधकीच्या जीवनशैलीमुळे अनेकदा मनावर ताण येत असतो. चिड़चिड़ होणे, राग येणे, कधी कधी तर काही लोक राग आला तरी बोलून व्यक्त करत नाहीत, त्या भावना आतल्या आत कोंडून ठेवतात. त्या भावनांचा निचरा न झाल्याने नैराश्य येते. या भावनांचा योग्य निचरा होणे गरजेचे आहे, मानसिक संतुलन साधणं ही तितकेच महत्त्वाचे असते, ही महत्त्वपूर्ण बाब लेखकाने अधोरेखित केली आहे आणि खरेच आजकालच्या वातावरणात सकारात्मक ऊर्जा निर्माण करण्याची खरी गरज आहे.

मन आणि विचारांचे सामर्थ्य माहीत नसल्यामुळे अनेक माणसे कळत अथवा नकळत सतत नकारात्मक विचार करत असतात. काही जणांना नकारात्मक विचार करण्याची एवढी सवय असते की प्रत्येक गोष्टीबाबत त्यांच्या मनात नकारात्मक विचारच अगोदर येतो. शिवाय आपण कळत आणि नकळत सतत नकारात्मक विचार करत आहोत याची पुसटची जाणिवदेखील या लोकांना नसते. आपल्या मनातील एखादा सकरात्मक विचार आपलं आयुष्य बदलू शकतो, इतकी शक्ती त्यात असते. त्यामुळे सकारात्मकतेची बीजे मानवी मनात रुजली गेली पाहिजेत.




माणसाचं दिसणं महत्वाचे नसते तर त्याचे असणे महत्त्वाचे असते. म्हणजेच त्याचे विचार , त्याचं मन कसे आहे, तसेच त्याचे व्यक्तिमत्त्व आकाराला येत असते. एकूणच मानवी जीवनात मनाची भूमिका किती महत्वाची आहे, याची जाणीव या पुस्तकाद्वारे होते. मानसिक आरोग्य जपण्यासाठी तसेच उत्तम यश मिळवून आपले ध्येय साध्य करण्यासाठी मनाचा गाभारा जपण्याचा मौलिक संदेश लेखकाने दिला आहे. खरेच हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे आवश्यक आहे.

'मनाच्या गाभाऱ्यात' पुस्तकाला प्रा. डॉ. संजय देशमुख यांनी मौलिक प्रस्तावना लिहिली आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ प्रवीण कोर्डे यांनी साकारले आहे. तसेच पुस्तकातील रेखाचित्रे कवी रामदास खरे यांनी काढली आहेत. मानवी मन जपण्याचे सोपे तंत्र आणि निरोगी शरीरासोबत निरोगी मनाची साधना करण्याचा सोपा मार्ग या पुस्तकातून नक्की सापडेल !

**(मनाच्या गाभाऱ्यात - लेखसंग्रह / प्रा. डॉ. अशोक पाटील / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १३० रुपये )**

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) – समजून घेण्याची दिशा-दृष्टी



डॉ. मारोती तेगमपुरे
संपर्क क्र. ९४२३९९३१३७

आधुनिक केसरी

**के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील नवीन शैक्षणिक धोरणातील (२०२०) पाचवीपर्यंतचे मातृभाषेतून शिक्षण, तीन ते अठरा वयोगटाचा शिक्षण हक्क कायद्यांतर्गत करण्यात आलेला समावेश, शिक्षणावर सकल राष्ट्रांतर्गत उत्पन्नाच्या ६ टक्के खर्चाची भूमिका या खऱ्या अर्थाने नवीन शैक्षणिक धोरणातील जमेच्या बाजू म्हणाव्या लागतील. मुळात पाचवीपर्यंतचे शिक्षण मातृभाषेतून देण्यात येईल, असे या शैक्षणिक धोरणात म्हटले आहे, असे सर्वत्र म्हटले जात आहे. परंतु नवीन शैक्षणिक धोरणातील मूळ प्रस्तावात वेगळेच काहीतरी म्हटले आहे. ते म्हणजे 'जेथे शक्य असेल तेथे मातृभाषेतून शिक्षण दिले जाईल.' ही झाली एक बाजू. दुसरी बाजू अशी की, यापूर्वी १९६४- ६६ मध्ये कोठारी शैक्षणिक आयोगाने याविषयीची स्पष्ट मांडणी केलेली असून त्यामध्ये म्हटले आहे की, त्रि-भाषा सूत्राची अंमलबजावणी करून मातृभाषा, राष्ट्रभाषा आणि संपर्क भाषा (इंग्रजी) या भाषा मुलांना शिकवण्यात याव्यात.**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) – समजून घेण्याची दिशा-दृष्टी

म्हणजेच उत्पनाचा स्तर आणि गळतीचे प्रमाण यामध्ये सहसंबंध असल्याचे स्पष्ट होते. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून तीन हजार पेक्षा अधिक संख्या असणाऱ्या शैक्षणिक संकुलाच्या निर्मितीचा घाट घातला असून कमी विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळा-महाविद्यालयाचे समावेशन केले जाणार असून यामुळे कुटुंबापासून शाळा महाविद्यालयाचे अंतर वाढल्यामुळे गळतीच्या प्रमाणात अधिक वाढ होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. विशेषतः मुलींच्या,अनुसूचित जाती-जमातींच्या, इतर मागासवर्गीयांच्या शिक्षणावर यामुळे गंभीर परिणाम संभवतो. कमी उत्पन्न गटातील विद्यार्थ्यांना आपले शिक्षण पुढे कसे घेऊन जावे हा येणाऱ्या काळात गंभीर प्रश्न ठरणार आहे. याबरोबरच अन्य प्रगतिपथावरील राष्ट्राच्या तुलनेत औपचारिक कौशल्य शिक्षणप्राप्त मनुष्यबळाचे प्रमाण कमी आहे. आपण याकडे दुर्लक्ष करू शकत नाही. स्कील इंडिया नावाने २०१५-१६ आणि २०१७-१८ या वर्षाचे स्वतंत्र अहवाल आले आहेत. यामध्ये नमूद केल्याप्रमाणे कुशल मनुष्यबळाच्या बाबतीत इतर अनेक राष्ट्राशी तुलना केली तर आपण कुठे आहोत, याविषयीचा काहीएक अंदाज येऊ शकतो. औपचारिक कौशल्य शिक्षण प्राप्त मनुष्यबळाचे शेकडा प्रमाण अमेरिकेत ५२ टक्के, ब्रिटन ५८ टक्के, जर्मनी ७५ टक्के, जपान ८० टक्के आणि चीनमध्ये हे प्रमाण २४ टक्के इतके आहे, तर भारतात औपचारिक व अनौपचारिक कौशल्य आत्मसात केलेल्या मनुष्यबळाचे प्रमाण ५ टक्क्यापर्यंत जाते. अधिक ढोबळपणे तपासले तर हे प्रमाण १० टक्क्यांपर्यंत जाऊ शकेल. या अतिशय महत्त्वपूर्ण घटकांचा विचार करून काही ठोस तरतुदी नवीन शैक्षणिक धोरणात करण्यात आलेल्या आहेत काय की फक्त शब्दांची चलाखी पाहावयास मिळते, यावर जिज्ञासूंनी लक्ष देणे गरजेचे आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम १७ द्वारे देशातील सर्व पातळीवरील अस्पृश्यता नष्ट केली गेली. ४६ द्वारे दुर्बल जनवर्ग आणि विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन शासन करील. याबरोबरच सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण शासन करील असा विश्वास देण्यात आला. परिणामी भारतीय स्वातंत्र्यानंतर शिक्षण, नोकऱ्या याबाबतीत संधीचे दरवाजे उघडले गेले. यामुळे दुर्बल घटकातील जनतेच्या आशा-आकांक्षा पल्लवीत होणे स्वाभाविकच होते. याचा एकूणच परिणाम असा झाला की प्रस्थापित जात / वर्ग गटाला या दुर्बल घटकातील जनतेची आभासी भीती वाटायला सुरुवात झाली. या दुर्बल घटकांचा सामाजिक-आर्थिक कमकुवतपणा कायम ठेवायचा तर त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणे आवश्यक होते. परंतु राज्यघटनेतील कलम ४६ प्रमाणे बंचित ठेवणे शक्य नव्हते. अशावेळी यांच्या हाती अमोघ शास्त्र सापडले. ते म्हणजे दुहेरी हल्ला चढवायचा, एका बाजूला शिक्षण कुणालाही प्रत्यक्ष नाकारायचे नाही, तर दुसऱ्या बाजूस ते इतके महाग करायचे की, ते या प्रवाहात येणारच नाहीत. याबरोबरच दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून मन आणि मस्तिष्क याची जडणघडण अशा पद्धतीने करायची की, त्यांना अक्षर ओळख होईल, परंतु त्यांच्यामध्ये कार्यमूलक साक्षरतेचा अभाव असेल. मुळात कोणत्याही प्रकारची साक्षरता हे शिक्षणाच्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल असते, यामध्ये काहीएक शंका नसली तरी साक्षरता आणि शिक्षण यामध्ये मूलभूत पातळीवर फरक आहे. यामुळे साक्षरता म्हणजे शिक्षण हे समीकरण फसवे / दिशाभूल करणारे आहे. शंभर टक्के साक्षरता निर्माण होणे आणि देशातील कार्यमूलक साक्षरतेचे प्रमाण किमान पहिल्या टप्प्यात ५० टक्क्यांपर्यंत तरी पोहचणे या दोहोंचा विचार केला तर संख्यात्मक वृद्धी बरोबर गुणात्मक वृद्धी होणे अभिप्रेत आहे. परंतु ध्येय विषयक स्पष्टता नसल्याने त्याचा म्हणावा तसा विकास झाला नाही / होत नाही. अगोदरच्या काळात 'मनुवादी' समाजव्यवस्थेने शिक्षण नाकारले आणि आता 'मनी' वादामुळे शिक्षण नाकारले जाणार आहे. म्हणून हे शैक्षणिक धोरण खऱ्या अर्थाने भांडवलदार हिताय-मनुवाद सुखाय असेच आहे. म्हणून याविषयी समाज म्हणून सखोल चिंतन




होणे गरजेचे आहे. खरे तर शिक्षण हे देशातील स्थानिक जनतेच्या ( देश-राज्य-प्रदेश-जिल्हा ) आशा- आकांक्षाशी निगडित असले पाहिजे. तरच व्यक्तीस वैश्विक दृष्टी बरोबरच आपल्या आजूबाजूला काय सुरू आहे, काय गौरवपूर्ण आहे, काय प्रेरणादायी आहे, आणि काय समस्यात्मक आहे, याविषयीची काहीएक जडणघडण होऊ शकते. अन्यथा एकरेषीय दृष्टी विकसित होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात संभवतो.

आज रोजी देशातील शिक्षण क्षेत्राचे वास्तव चित्र विदारक असून हे चित्र बदलाच्या दृष्टीने नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (२०२०) काही आश्वासक परिस्थिती पहावयास मिळते का? हे समजून घेण्यापूर्वी काही बाबी समजून घेणे आवश्यक आहे. एकूणच शिक्षणावर केला जाणारा तुटपुंजा खर्च आणि त्याचे होणारे परिणाम जर बघितले तर परिस्थिती गंभीर आहे, असेच म्हणावे लागेल. देशातील ४२ टक्के शाळांना कंपाऊंड नाहीत, ४५ टक्के शाळांमध्ये मुख्याध्यापकांसाठी वेगळी खोली नाही, ८० टक्के शाळांमध्ये वीजेचा पुरवठाच नाही, १३ टक्के शाळांमध्ये पुरेसा पाणी पुरवठा नाही, १८ टक्के शाळांमध्ये वाचनालय नाही, ९५ टक्के शाळांमध्ये ग्रंथपाल नाहीत, ४० टक्के शाळांमध्ये खेळाचे मैदान नाही, ७२ टक्के शाळांमध्ये संगणक नाहीत आणि उरलेल्या २८ टक्के पैकी १४ टक्के शाळांमध्ये संगणक चालत नाहीत. फक्त ९.५ टक्के शाळांमध्ये आंतरजाल (इंटरनेट) आहे, ७०- ७२ टक्के शाळांमध्ये प्रयोगशाळा नाहीत, ४४ टक्के शाळांमध्ये स्वच्छ टायलेट्स नाहीत, ४४ टक्के शाळांमध्ये मुलींसाठी टायलेट्स नव्हती. पाचवीतल्या ५२ टक्के विद्यार्थ्यांना दुसरीतला घडा वाचता येत नाही, पाचवीतल्या ४९ टक्के विद्यार्थ्यांना दोन अंकाची गणितंही करता येत नाहीत. (अच्युत गोडबोले, परिवर्तनाचा वाटसरू, १६-२८ फेब्रुवारी २०२२) ही आकडेवारी चार वर्षापूर्वीची असून आजही यामध्ये फारसा सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येत नाही. कारण या काळातही शिक्षणावरचा खर्च वाढला नाही. (कोरोना महामारीचा काळ तर शिक्षण क्षेत्राच्या संदर्भात आपण अनुभवलाच आहे.) हा खर्च वाढवण्याच्या संदर्भातील धोरणकर्त्यांची काहीएक मानसिकता दिसत नाही. नवीन शैक्षणिक धोरणात बहुविद्याशाखीय शैक्षणिक संकुल निर्माण केली जातील असे म्हटले आहे. त्यासाठी एक विद्याशाखीय महाविद्यालये (ज्या ठिकाणी ३००० पेक्षा कमी विद्यार्थी प्रवेशित असतील अशी बहुविद्याशाखीय महाविद्यालये सुद्धा) यामध्ये संकलित केली जातील. या संकुलात विद्यार्थी अभियांत्रिकीपासून कला, वाणिज्य, विज्ञान, व्होकेशनल कोर्स (त्याने इच्छा व्यक्त केली ते...) चालतील असं म्हटल आहे. देशातील सर्वांगीण पातळीवरील वास्तवाचे भान बाळगून धोरण आखणी झाली नाही, याचा हा सर्वोत्कृष्ट पुरावा आहे. दुसरे असे की, जागतिक पातळीवर शिक्षक-विद्यार्थी प्रमाणाशी आपले प्रमाण दूरदूरवर मेळ खात नाही. अमेरिका, चीन, क्युबा या राष्ट्रातील हे प्रमाण (साधारणपणे प्रती १६ ते २० विद्यार्थी एक शिक्षक) आणि आपले (४६ विद्यार्थी एक शिक्षक) अगदी दुपट्टीपेक्षाही अधिक (यामधील पूर्णवेळ, अर्धवेळ, कंत्राटी, तासिका तत्वावरील या सर्वांचा (अंतर्भाव) आहे.

याप्रसंगी आणखी एक बाब समजून घेणे आवश्यक वाटते. युनेस्कोने शिक्षणाची चार प्रमुख उद्दिष्टे सांगितली आहेत. यामध्ये व्यक्ती आणि समाजाचा एकत्रित विकास, शिक्षणातून जगण्यासाठीची कौशल्ये आत्मसात करता आली पाहिजे. तिसरे म्हणजे सतत शिकत राहण्याची, कायम ज्ञान आत्मसात करण्याची ऊर्जा शिक्षणाच्या माध्यमातून विकसित होत गेली पाहिजे. आणि शेवटचे म्हणजे सर्व समूहांचा जात, धर्म, प्रांत या अभिनिवेशात न अडकता सहजीवनाची प्रेरणा विकसित होणे. या चार उद्दिष्टांची पूर्तता ज्या शैक्षणिक धोरणाच्या/ नीतीच्या माध्यमातून होते. त्यातून व्यक्ती सर्वांगीणदृष्ट्या परिपूर्ण नागरिक म्हणून ज्ञानसंपन्न होते, त्या शिक्षणाला आपण परिपूर्ण शिक्षण असं म्हणत असतो. या चार उद्दिष्टांची पूर्तता नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून होणार आहे काय? हा खऱ्या अर्थाने गंभीर आणि कळीचा प्रश्न आहे. या उद्दिष्टांची पूर्तता नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून होत असेल तर हे धोरण दीर्घकाळासाठी फलदायी आहे. जर होत नसेल तर याचे नकारात्मक परिणाम अतिशय भयान स्वरूपाचे असतील यावर सुद्धा समाज म्हणून विचार होणे गरजेचे आहे.

# आंतर जालाधारित प्रशिक्षण व योजना !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**_संपूर्ण जगात इ.स.१९२९ साली मंदीची लाट पसरली होती. त्यानंतर इ.स.१९३१मध्ये इंग्लंडने सुवर्णचलन बंद केले. पुन्हा नंतर यात दुसऱ्या महायुद्धाचीही भर पडली. या तिन्ही घटनांचे विविध देशांची अर्थव्यवस्था, चलनात्मक धोरण व आंतरराष्ट्रीय व्यापार आदींवर विपरीत परिणाम घडून आले. अनेक देशांनी आपापले चलनविषयक वेगवेगळे धोरण सुरू केले. यामुळे संपूर्ण आंतरराष्ट्रीय व्यापार अडचणीत आला होता. पुढे वाचा श्री.एन. के. कुमार जी. यांच्या या अभ्यासपूर्ण लेखातून...**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीः आंतरराष्ट्रीय नाणेनिधी- इंटरनॅशनल मॉनेटरी फंड लघुरूप- आयएमएफ होय. ती सदस्य राष्ट्रांना मुख्यतः विनिमय दरावर आणि देवघेवींच्या ताळेबंदावर प्रभाव टाकणाऱ्या बृहत-अर्थशास्त्रीय धोरणांबाबत पाठपुरावा करावयास लावते. जागतिक वित्तीय व्यवस्थेवर लक्ष ठेवणारी ती आंतरराष्ट्रीय संघटना आहे. आंतरराष्ट्रीय विनिमय दरांमध्ये स्थिरता आणणे आणि कर्जे, पुनर्रचना किंवा मदतीच्या मोबदल्यात इतर राष्ट्रांना आपली आर्थिक धोरणे अधिक उदार बनवावयास लावून विकास घडवून आणण्याचे घोषित ध्येय असणारी ही संस्था आहे. मुख्यतः गरीब राष्ट्रांना ती अल्पकालीन कर्जे देते. तिचे मुख्यालय संयुक्त संस्थानातील वॉशिंग्टन, डिस्ट्रिक्ट ऑफ कोलम्बिया इथे आहे. त्याचे वैशिष्ट्ये असे- * आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाण-घेवाणीत समतोल राखणे. * परदेशी व्यापारातील असमतोल दूर करण्यासाठी परदेशी चलन प्राप्त करून देणे. * चलनविषयक आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रस्थापित करणे. * एखाद्या देशाचे देय चलन फेडण्यासाठी अन्य चलन देण्याची सुविधा आस्तित्त्वात आणणे. * परदेशी चलन विनिमय दरात स्थैर्य प्राप्त करणे. अनेक देशांची अर्थव्यवस्था कोलमडून पडली. ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन लॉर्ड जे.एम.केन्स याने आंतरराष्ट्रीय सलोखा प्रस्थापित होण्यासाठी एक योजना सादर केली. या योजनेवर विचार करण्यासाठी अमेरिकेतील ब्रेटनवूड येथे जुलै १९४४मध्ये एक परिषद बोलाविण्यात आली. या परिषदेला ४४ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर परिषदेत आंतरराष्ट्रीय नाणेनिधी- इंटरनॅशनल मॉनेटरी फंड- आयएमएफ व आंतरराष्ट्रीय पुनर्निर्माण व विकास बँक- जागतिक बँक स्थापण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. त्याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची स्थापना दि.२७ डिसेंबर १९४५ रोजी झाली आणि प्रत्यक्ष कामकाज दि.१ मार्च १९४७ रोजी सुरू झाले. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घेणारा पहिला देश फ्रान्स होता. जे जागतिक बँकेचे सदस्य असतात, ते आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचेही सदस्य असतात. दि.१२ एप्रिल २०१६ला नौरू प्रजासत्ताक या देशाला सदस्यत्व मिळाल्यामुळे त्यातील सदस्यसंख्या १८९ झाली. आयएमएफ निधी कोश हा सभासद देशांनी जमा केलेल्या कोशाने बनलेला असतो. प्रत्येक सभासद देशाने कोशाचा किती वाटा द्यावा, हे संबंधित देशाचे राष्ट्रीय उत्पन्न ५० टक्के, खुली अर्थव्यवस्था ३० टक्के, आर्थिक बदलक्षमता १५ टक्के आणि परकीय चलनसाठा ५ टक्के भार इत्यादी घटक विचारात घेऊन ठरविण्यात येते. सभासद देशांनी त्यांच्या कोट्यापैकी २५ टक्के भाग हा डॉलर व सुवर्णात जमा करावा लागतो. या पद्धतीने संचलित झालेला निधी सामान्य खात्यात जमा ठेवण्यात येतो. दर पाच वर्षांनी सभासद देशाचा कोटा बदलण्यात येतो. या कोट्यावरून सदस्य देशाच्या गव्हर्नरला आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या मतांचा अधिकार मिळतो, प्रत्येक सदस्यदेशाला काही स्थिर मते आणि त्या देशाच्या कोट्यापैकी प्रत्येकी १ लाख एसडीआरमागे १ मत याप्रमाणे मतांचा अधिकार असतो, स्थिर मते बदलत असतात. आयएमएफचा आणखी एक निधी कोश म्हणजे स्पेशल ड्रॉईंग राईट्स- एसडीआर होय. हा निधीकोश विशेष खात्यात जमा असतो. या खात्यातील निधी अमेरिका, जपान, फ्रांस, इंग्लंड या देशांच्या चलनाद्वारे संकलित झालेला असतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कुठल्याही निर्णयासाठी ८५ टक्के बहुमत लागते, त्यामुळे सर्वाधिक कोटा म्हणजेच मताधिकार असलेल्या देशांचा प्रभाव आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या निर्णयावर पडत असतो. साधारणतः दर ५ वर्षांनी सदस्य देशांच्या कोट्यांचा आढावा घेतला जातो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कारभारावर मुख्य नियंत्रण हे बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे असते. प्रत्येक सभासद देशाचा एक गव्हर्नर व तसेच एक पर्यायी गव्हर्नर या मंडळावर घेण्यात येतो. गव्हर्नरांचे मंडळ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे धोरण ठरविणारी मुख्य चौकट असते. साधारणतः वर्षातून एक वेळा या मंडळाची बैठक होते. या मंडळाद्वारे कार्यकारी संचालक मंडळाची निवड केली जाते. संचालक मंडळ वीस सदस्यांचे असते. त्यापैकी चौदा निर्वाचित व सहा अधिकतम कोटा देणारे सदस्य असतात. रोजचे व्यवस्थापन संचालक मंडळाद्वारे चालते. संचालक मंडळातून एक व्यवस्थापकीय संचालक म्हणून निवडला जातो. सभासद देशांना त्यांच्या कोट्याच्या प्रमाणात मताचा अधिकार दिलेला असतो. एकूण ८५ टक्के मताधिक्याने धोरण बदलण्यात येते. याद्वारे सभासद देशाचा चलन विनिमय दर ठरविला जातो. यासाठी सभासद देशांना त्यांच्या चलनाचे




मूल्य डॉलर व सुवर्णाच्या रूपात जाहीर करावे लागते. या पद्धतीमुळे विविध देशांच्या चलनांचा परस्पर विनिमय दर निशिचत करता येतो. परदेशी देवाणघेवाणीत असंतुलनाची समस्या असल्यास दहा टक्क्यापर्यंत हा घोषित दर बदलण्याचा अधिकार असतो. आयएमएफतर्फे सभासदांना विविध प्रकारचा कर्जपुरवठा व स्रोत उपलब्ध करून देण्यात येतात. देशाचा कोटा व निधीकडे त्या देशाचा असणारा चलनसाठा यांच्यातील फरकाएवढी रक्कम सभासदांना कधीही काढता येते. या उचल रकमेवर व्याज आकारण्यात येत नाही. त्यासाठी विशेष अटी लादण्यात येत नाहीत व उचल परत करावी लागत नाही. एखाद्या देशाच्या कोटा रकमेच्या पंचवीस टक्क्यांपर्यंत निधीकडून विनाअटीचे कर्ज मिळते. अन्य प्रकारच्या कर्जासाठी अनेक जाचक अटी असतात. विदेशी देवाणघेवाणीचे संतुलन साधण्यासाठी निधीतर्फे सुचविण्यात येणाऱ्या आर्थिक बदलांची पूर्तता करण्याची लेखी हमी दिल्यासच अन्य प्रकारचे कर्ज मिळू शकते. आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राथमिक वस्तूंचा साठा करण्यासाठी कोट्याच्या ४५ टक्के, पूर-दुष्काळ इत्यादीमुळे आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीत असंतुलनाची समस्या असणाऱ्या देशांना ७० ते १४० टक्के कर्ज संबंधित अटींसह मिळण्याची सोय आयएमएफ अंतर्गत उपलब्ध असते. त्याचबरोबर आर्थिक तूट, चलन विनिमय दर, आयशात निर्यात कर, आर्थिक धोरण इत्यादीसंबंधी निधीकडून सल्ला व मार्गदर्शन देण्यात येते.

जागतिक बँकः जागतिक बँक- वर्ल्ड बँक ही एक आंतरराष्ट्रीय वित्त आणि पतपुरवठा संस्था आहे. हीची स्थापना दि.२७ डिसेंबर १९४५मध्ये झाली. ब्रेटन वुडस् पद्धती समितीच्या जागतिक आर्थिक नियंत्रण शिफारशीं वापरण्यात आल्या होत्या. या समितीमध्ये ४५ मित्रराष्ट्रे होती. विकसनशील देश व अविकसित देश यांना विकासासाठी कर्जपुरवठा करणारी संस्था असे याचे स्वरूप आहे. या बंकेने पहिले कर्ज फ्रांस या देशाला दिले. जागतिक बँकेची उद्दिष्टे- सरकारांचे सबलीकरण व सरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण, अर्थव्यवस्थांचा विकास, भ्रष्टाचार निर्मूलन, गरीबी हटाव, संशोधन व शिक्षण ही आहेत. शिक्षणासाठी जागतिक बँक विशेष परिश्रम घेते. यासाठी आंतर जालाधारित प्रशिक्षण व इतर पर्यायांचा उपयोग केला जात आहे. भारतासहित अनेक देशांना या बँकेने विवीध प्रकल्पासाठी कर्जे दिली आहेत. पैकी भारतातील गुजरातमधील नर्मदा नदीवरील विवादास्पद धरण सरदार सरोवर प्रकल्पाचे कर्ज त्यातील धोके दिसून आल्याने तिने परत घेतले. इ.स.१९९८ सालातल्या मंदीच्या काळात या जागतिक बँकेने मेक्सिको व इंडोनेशिया या देशांना दिलेला सल्ला आर्थीकदृष्ट्या अतिशय धोक्याचा ठरला आहे.

विरूद्ध बाजूः याच वेळी बँकेचे विरोधक असेही म्हणतात, की बँकेची काही लपवलेली उद्दीष्टेही आहेत. जसे की दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्य लयाला जात चाललेल्या इंग्लंडला नवीन आर्थीक साम्राज्य उभारण्यासाठी या बँकेचा उपयोग करून घेतला आहे. बँकेचे माजी अध्यक्ष व अर्थतज्ज्ञ जोसेफ स्तिगलिट्झ यानीही इ.स.१९९९मध्ये तिच्या उद्दिष्टांशी सुसंगत नसलेल्या धोरणांवर टीका केली होती.

# समाज मनाचे चित्र उमटवणाऱ्या कविता : शब्द आशयाचे घन

आधुनिक केसरी

**शब्दांच्याच सामर्थावर कवी साहित्यिक आपल्या साहित्याची अमिट अशी ओळख निर्माण करत असतो.कोणता शब्द कुठे कसा वापरावा, वापरला पाहिजे.हे ज्याला कळते तोच साहित्यिक, कवी होत असतो. फक्त शब्दांशी खेळून र ला र आणि ट ला ट जोडून कविता होत नसते. तर त्यासाठी त्या शब्दा सोबतच आपल्या नित्याच्या वागण्या बोलण्यातली निष्ठा जेव्हा सच्ची असते.तेव्हा खरी कविता जन्मते त्यामध्ये खूप मोठा आशय भरलेला असतो. शब्दातून जो तो आपापल्यापरीने ज्याच्या-त्याच्या आकलन शक्तीप्रमाणे अर्थ लावत असतो, म्हणून कवी संपत गर्जे यांच्या 'शब्द आशयाचे घन' या कविता संग्रहातून अध्यात्म, निसर्ग, समाजजीवन आणि बालमनाला नीतिमूल्य शिकवणाऱ्या सच्च्या कविता या संग्रहातून त्यांनी लिहिलेल्या आहेत.**

निस्वार्थपणे जगणाऱ्या माणसाला समाजात वावरत असताना जेव्हा स्वार्थी, मतलबीपणे वागणारे मतलबी लोक दिसतात.तेव्हा कवीच्या मनाला वेदना होतात.कारण त्याने नित्याने न्यायाने वागणाऱ्या माणसाला त्याच्या सत्याचरणामुळे होणाऱ्या वेदना दिसत असतात.समाजात मात्र मतलबी लोक स्वतः चा स्वार्थ साधतात तेव्हा या जगात कोणीच कोणाचा नाही जो तो स्वतःचा स्वार्थ पाहत असतो असे सगळीकडे दिसते म्हणून ते म्हणतात.

**'नाते नसे कुणाचे**
**कोण नाही कोणाचा**
**फक्त इथे जन्मला**
**स्वार्थ ज्याचा-त्याचा'**

स्वार्थ, मतलबीपणा कमी करायचा असेल, माणसाला सुखा-समाधानाने, आनंदाने जगायचे असेल तर अध्यात्मा सारखी दुसरी कोणती शक्ती नाही.जी आपल्याला आत्मिक समाधान देते,सत्य आचरण करण्याची शिकवण देते, अध्यात्मिक संस्कारामुळे कोणाचे वाईट करण्याची वृत्ती मनात राहत नाही, म्हणून अध्यात्मिक मार्गाने जाणे केव्हाही चांगले, म्हणूनच की काय मग कवी या मतलबी,ढोंगी लोकांचे हे ढोंग नष्ट व्हावे.त्यांना चांगला मार्ग मिळावा, म्हणून 'शब्द आशयाचा घन' मधून भरपूर प्रमाणात अध्यात्म, भक्ती मार्गाच्या,गुरु महिमा,पंढरीची वारी, संजीवन समाधी, तुळशी महात्म्य, वारकरी,राधाकृष्ण या कवितांमधून येतात.गुरु महिमा गातांना ते म्हणतात.

**'गुरु कैवल्याचे द्वार**
**गुरु मांगल्याचे सार**
**गुरु सर्वांचे आधार सर्वकाळ'**

लहान-मोठा,जात- धर्म,पंथ, लिंगभेद हे सगळे विसरुन सारे भक्त त्या सावळ्या विठ्ठलाला भेटण्यासाठी भाळावर गोपीचंदन टिळा लावून, मुखाने हरी नाम घेत गळ्यात तुळशीची पवित्र माळ घालून, अबीर बुक्का उधळीत पंढरीच्या वारीला जातात.ही वारी माणसाला खरा माणूस धर्म शिकवते.मनातले सारे भेदाभेद हटवण्याचे काम करते. 'वारकरी' आणि 'पालखी' या कवितांमधून विठ्ठलाच्या भेटीचा महिमा आणि त्याबद्दलची ओढ पुढील शब्दात ते व्यक्त करतात.

**'टाळ-मृदुंगाचा सुश्राव्य**
**गजर चालला पांडुरंगाच्या भेटीसाठी जीव**
**व्याकुळला'**




विद्यार्थ्यांमध्ये रमणारे संपत गर्जे यांच्यातील शिक्षक नेहमी जागा असतो. विद्यार्थ्यांच्या मनात संस्काराची पेरणी करून आदर्श समाज निर्माण करू पाहणारे संपत गर्जे हे विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचन, त्याचे फायदे,त्याची आवश्यकता व ग्रंथ वाचण्याची महती म्हणूनच सांगतात.ग्रंथ वाचन केले तरच सुजाण समाज निर्माण होईल.हे त्यांना माहित आहे,म्हणून ग्रंथ महिमा गाताना ते म्हणतात.

**'ग्रंथ उजळती तेजोमय ज्ञानज्योती**
**शिकवीती समता अन् विश्वशांती'**

ग्रंथ जसे माणसाला योग्य मार्ग दाखवतात. त्याच पद्धतीने शाळा संस्काराचे केंद्र असते. तिच्यातून उद्याचा समाज घडत असतो. उद्याचा भारत कसा असेल याचा जर अंदाज घ्यायचा असेल तर आपल्याला आजच्या शाळा कशा आहेत आणि त्यामधून कोणत्या प्रतीचे विद्यार्थी घडत आहेत हे बघायला पाहिजे.संपत गर्जे यांच्या शाळेतील गुरुजी कसे आहेत आणि शाळा उद्याचे शिल्पकार कसे घडवते हे सांगताना ते म्हणतात.

**'ज्ञानसंपन्न करिती**
**गुरु विद्यार्थ्यास अपार**
**अशी आमची शाळा**
**घडवी उद्याचे**
**शिल्पकार'**

पण आजचे काही पालक जास्तच जागरूक झाल्या सारखे वागायला लागते आहेत आणि चिमुकल्या मुलांचे बालपण हिरावून घेऊन,त्यांना मुक्तपणे जगू देत नाहीत त्यांच्यावर संस्कार शिबिराच्या नावाखाली त्यांच्या वयाचा विचार न करता मुक्तपणे खेळणं बागडणं हे न करू देता,अतिरेकी शिस्त लावण्याचा प्रयत्न करतात म्हणून ते म्हणतात

**'गोंडस शिबीराच्या नावे**
**नका आमुची कळी चुरगळू'**

कवी संपत गर्जे यांना समाजात सदा आनंद असावा वाटतो. कोणाच्या मनात एकमेकांबद्दल द्वेषभाव असू नये.कोणी कितीही वाईट वागण्याचा प्रयत्न केला तरीही कवीला माणसाने चांगलेच वागले पाहिजे असे वाटते.जे आपल्या प्रगतीत अडथळे आणतात.त्यांना आपण मदत केली पाहिजे असे त्यांना वाटते.दुसऱ्याच्या आयुष्यात अंधकार पसरविणाऱ्याच्याही जीवनात आपण नंदनवन फुलवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत अशी त्यांची भावना असते, म्हणून ते म्हणतात.

'वाटेवर काटे पेरिले ज्यांनी माझ्या
तयांसाठी फुलांची पेरणी होऊनी आलो'

ज्यांनी आपल्या वाटेवर द्वेष भावनेने काटे पेरले त्यांच्याही वाटेवर फुलांची पेरणी करणारे कवी परंपरेची जी जोखडं आहेत. ते सारे झुगारून देण्यासाठी सज्ज झालेले आहेत.त्यांच्या मनात येणाऱ्या संकटांना भिडण्याची जिद्दच त्यांच्यात आहे. ही जिद्द संकटातून मार्ग काढण्यासाठी मदत करणार आहे. संकटांमध्ये खचून न जाता आलेल्या परिस्थितीला हिमतीने तोंड देत राहणे फार महत्त्वाचे असते.ही हिंमत त्यांच्या शब्दात, कवितेत आहे.

एकंदरीतच अशाने समृद्ध अशा शब्दांच्या आशयघन कवितांच्या माध्यमातून कवी संपत गर्जे यांनी कवितेतून समाजमनाचे चित्र आपल्या कवितेतून उमटवले आहे.

डॉ.लीला गोविलकर, यांची प्रस्तावना,कवी राजन लाखे आणि कवी दिगंबर शिंदे यांची समीक्षा संपत गर्जे यांची कविता समजून घ्यायला आपल्याला मदतच करते.

**कवितासंग्रह -शब्द आशयाचे घन**
**कवी - प्रा.संपत गर्जे**
**प्रकाशन - यशोदीप प्रकाशन,पुणे**
**मूल्य - १७५ पृष्ठ -१२४**


**शरद ठाकर, सेलू, जि. परभणी**
**८२७५३३६६७५**

# ससा आणि कासव

आधुनिक केसरी

एका जंगलामध्ये एक ससा आणि कासव राहत होते ससा हा नावाप्रमाणे चतुर आणि चपळ आणि कासव थोडे मंद असते. परंतु दोघांची चांगली मैत्री असते. एकदा सशाच्या मनामध्ये कासवा सोबत पैज लावण्याची इच्छा होते व तसे ससा कासवाला म्हणतो की, आपल्या दोघांमध्ये पैज लावूया जो कोणी या पैजमध्ये जिंकेल तो सर्वश्रेष्ठ असेल. ठरल्याप्रमाणे कासव देखील पैज लावायला हो म्हणतो. त्यावर ससा कासवाला म्हणते की जो कोणी समोरच्या टेकडी पर्यंत सर्वात प्रथम पोहोचेल तो ही शर्यत जिंकेल. ठरल्या प्रमाणे दुसऱ्या दिवशी कासवाची आणि सशाची पैज लागली. ससा होता चटळ ससा शर्यतीमध्ये सुरुवातीलाखूप धावत पळत सुटला आणि कासव हळूहळू शर्यत जिंकण्याचा प्रयत्न करीत होते. थोडे पुढे धावत आले आणि त्याने मागे वळून पाहिले तर त्याला कासव कोठे ही दिसले नाहीत त्यावर कसा म्हणाला, जोपर्यंत कासव माझ्यापर्यंत पोचतील तोपर्यंत एक झोप घेतो, असे म्हणून ससा एका झाडाखाली एक विश्रांतीसाठी थांबला. कासव हळूहळू चालत ससापर्यंत आले व कासवाने पाहिले ते ससा विश्रांतीसाठी झोपला आहे. कासव आपल्या मंद पावलाने हळूहळू टेकडीच्या दिशेने चालतं होते. कासव टेकडी पर्यंत पोचणार तोच सशाला जाग आली. ससा उठून पाहतो तर काय कासव त्याला कोठेही दिसेना त्यावर ससाने टेकडीच्या दिशेने धाव घेतली व तेथे गेल्याने त्याला कळाले की ही शर्यत कासवाने जिंकलेली आहे. अशाप्रकारे ससा च्या चपळता पुढे कासवाचा प्रयत्न जिंकला.

**तात्पर्य :** या बोधकथा यावरून आपल्या लक्षात येते की कधीही कोणाला कमी समजू नये व प्रयत्न केल्यानंतर यश आपोआप मिळते.





रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

# सहकारातील सुगंध आणि संस्कार !

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात सहकाराची चळवळ कै. धनंजय गाडगीळ यांच्या दूरदृष्टीने आणि पद्मश्री विठ्ठलराव विखे यांच्या कृतिशील प्रयोगातून सुरू झाली . साखर उत्पादन यापासून सुरू झालेली ही चळवळ समाजाच्या अनेक क्षेत्रात पसरली . विविध कार्यकारी सोसायटीच्या रूपाने ग्रामीण भागात तिने मुळे धरली आणि हळू हळू सहकारी बँकांचे जाळे संपूर्ण महाराष्ट्रात उभे राहिले. अर्थात ग्रामीण अर्थकारण आणि राजकारण या दोन्ही चा केंद्रबिंदू हे कारखाने , सोसायट्या आणि या बँका बनू लागल्या आणि मग त्यात दोष ही निर्माण होत गेले . यातून कारखान्यांचे खासगीकरण आणि बँकांची दिवाळखोरी समोर येऊ लागली आहे आणि एकूण सहकार हा स्वाहाकार होतो की काय ? अशी परिस्थिती निर्माण झाली ! एका अर्थाने वर्तुळ पूर्ण होत आले असे म्हणायला हरकत नाही .**

अर्थात कै . आण्णासाहेब कदम पाटील यांच्यासारख्या हाडाच्या काही कार्यकर्त्यांनी सहकार क्षेत्रात दिलेले योगदान हे निश्चितच प्रेरणादायी आहे. अशा स्वयंसेवकांची संख्या म्हणून मर्यादित होती,त्याचे दुष्परिणाम या क्षेत्राला भोगावे लागले . राहुरी कारखाना जरी अण्णांनी सोडून दिला तरी देवळाली प्रवरा सोसायटी आजही सचोटी साठी प्रसिद्ध आहे . नागरी पतसंस्था , बँका , अन्य सहकारी चळवळीत संघ स्वयंसेवक आज ठाम उभे राहिलेले दिसतात संघाचे कार्यकर्ते नेहमी एक लोकप्रिय वाक्याचा उपयोग करत असतात तो म्हणजे " संघ काही करणार नाही पण समाजात आवश्यक ते बदल घडवून आणेल " . पूजनीय गुरुजी एकदा म्हणाले होते " We want to dominate every walk of life ! " संघाने म्हणजे संघाच्या स्वयंसेवकांनी हळूहळू शाखेच्या संस्कारातून मिळालेल्या संस्काराची अभिव्यक्ती समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात करायला सुरुवात केली आणि त्याचे परिणाम दिसू लागले . कामगार क्षेत्र , विद्यार्थी क्षेत्र , शैक्षणिक क्षेत्र , किसान क्षेत्र असे पादाक्रांत करत असताना सहकार त्यात कसे अपवाद ठरेल ? संघावर नेहमी वेगवेगळ्या पद्धतीने टीका टिपणी करणारे , संघ तरुणांचे लोणचे घालतो म्हणणारे यांनी , संघाची प्रामाणिक समीक्षा करणाऱ्यांनी संघाच्या स्वयंसेवकांनी समाजात विविध क्षेत्रात उभ्या केलेल्या संस्था आणि संस्थाजीवन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले . लातूर चे विवेकानंद रुग्णालय , संभाजीनगरचे डॉ . हेडगेवार रुग्णालय किंवा अनेक शिक्षण क्षेत्रातील प्रकल्प किंवा संस्था या स्वयंसेवकांवर संघ शाखेत झालेल्या संस्काराची अभिव्यक्ती आहे . या सगळ्याची प्रकर्षाने जाणीव झाली ती एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ! कार्यक्रम होता कल्याण जनता सहकारी बँकेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या उद्घाटनाचा ! ८० चौरस फुटाच्या जागेत तीन कर्मचारी घेऊन सुरू झालेल्या या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे . सुमारे ४५ शाखा असलेल्या मल्टी स्टेट शेड्युल बँक हा दर्जा प्राप्त केलेल्या ह्या बँकेचा विकास दैदिपयमान हा शब्द पण कमी पडेल असा आहे . सर्वप्रथम संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारल्यावर कुठलेही भत्ते न घेण्याचा त्यांनी संकल्प केला . आपण किंवा आपले नातेवाईक कर्ज घेणार नाहीत हे निश्चित केले आणि कुणाला जामीन राहायचे नाही हा नियम केला ! या सगळ्या गोष्टी आज तागायत संचालकांनी पाळल्या ! अर्थात रिझर्व्ह बँकेने याच गोष्टी पुढे नियं म्हणून केल्या ! " शुद्ध बीजा पोटी फळे रसाळ गोमटी !" असे म्हणतात त्याचे प्रत्यक्ष दर्शन जेव्हा बँकेचा इतिहास आजच्या कार्यक्रमात उलगडून दाखवला जात होता तेंव्हा कळत होते . विना संस्कार नाही सहकार ! असे ब्रीद घेऊन सहकार क्षेत्रात संघाच्या कार्यकर्त्यांनी सहकार भारती हे संघटन सुरू केले आणि सर्व क्षेत्रात असलेल्या सहकार तत्वाला एक दिशा देण्याचा प्रयत्न केला . स्वर्गीय लक्ष्मणराव इनामदार यांनी याच्या स्थापनेच्या पासून एक दिशा देण्याचा प्रयत्न केला . आज कल्याण जनता सहकारी बँके बरोबर महाराष्ट्रात पुणे जनता बँक , जनसेवा बँक , डोंबिवली नागरी , ठाणे जनता सहकारी , देवगिरी बँक , यवतमाळ अर्बन अशा महाराष्ट्रातील सर्व भौगोलिक क्षेत्रात या बँकांनी सहकारातील संस्काराचे महत्व अधोरेखित केले आहे. आज कल्याण जनता बँकेची ३२०० कोटी ठेवी , १९०० कोटी कर्ज , १०० शेअर कॅपिटल , ६०००० सभासद आणि १९०० कोटी नफा ही आकडेवारी पुरेशी बोलकी आहे ज्यातून या बँकेची स्थिती कळू शकते ! या मागे या बँकेच्या संचालकांची ध्येयवादी वृत्ती कारणीभूत आहेच पण या बँकेत काम करणाऱ्या सेवाभावी कर्मचाऱ्यांचे योगदान आहे. साधारण याच धर्तीवर बहुतांश वर उल्लेखलेल्या स्वयंसेवकांनी चालवलेल्या बँकांची वाटचाल आहे. एकीकडे सहकार चळवळ आणि सहकारी बँकांचे भविष्य यावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असताना दुसरी कडे ही जी स्थिती आहे ती निश्चितच मनाला भावणारी आहे. याचे रहस्य काय ? याची प्रामाणिक पणे समीक्षा खरे तर आर्थिक, सामाजिक, सहकारातील तज्ज्ञांनी करण्याची गरज आहे पण सहकाराच्या पवित्र क्षेत्रात राजकारणाची आणि घराणेशाहीची कीड आणून हे क्षेत्र प्रदूषित करणारे आणि त्यांचे चेलेचपाटे यावर काहीच बोलणार नाहीत. परंतु आजच्या कार्यक्रमात या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे नितीनजी गडकरी यांनी आपल्या भाषणात याचे योग्य विश्लेषण केले . विकासाची दृष्टी आणि भान असलेल्या ह्या नेत्याने अशा कार्यक्रमात अराजकीय भाषण कसे असते याचे प्रात्यक्षिकच प्रगट केले . संस्था या संस्थेसारख्याच चालवायचा असतात हे सांगताना त्यांनी संघाने दिलेल्या संस्काराचा परिणाम म्हणून आज अशा बँका , अशा संस्था उभ्या आहेत हे सांगितले . पंडित दिन दयाळजी यांची अंत्योदय संकल्पना यशस्वी होण्यासाठी आणि त्यांनी वर्णन केलेल्या दरिद्री नारायण पुरुषाची सेवा करण्यासाठी अशा आर्थिक संस्थांनी काम केले पाहिजे हे त्यांनी मांडलेच आणि यासाठी कल्याण जनता बँकेने रुपये २००/ कर्ज देऊन २००० सायकली वाटल्याचे उदाहरण पण दिले . बँकेचे दरवाजे सामान्य जनांना आपले व्यवसाय करण्यासाठी लागणाऱ्या कर्जासाठी उघडे ठेवा हे सांगताना कर्ज घेणाऱ्यांना हेलपाटे मारू देऊ नका हे आवर्जून सांगितले . निर्णय चुकणे हा दोष नाही पण निर्णय न घेणे हा रोग जास्त घातक आहे असे ते म्हणाले .



या निमित्ताने रस्ते बांधणाऱ्या गडकरींच्या विकासाचे व्हिजन प्रेक्षकांना अनुभवायला मिळाले . इथेनॉल , बायो डिझेल , हायड्रोजन आणि विद्युत या इंधनाचा वापर करण्यावर भर देत डिझेल , पेट्रोल हद्दपार करण्याची आवश्यकता सांगताना गडकरी यांनी यातून पर्यावरण आणि अर्थकारण या दोन्हीची सांगड घालण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली आणि अर्थात अशा गाड्याना प्रोत्साहन देताना बँकेने कर्ज देताना व्याजात थोडी सवलत देण्याचे आवाहन ही त्यांनी केले . कुठल्याही संस्थेच्या शीर्ष स्थानी असणाऱ्या व्यक्तींच्या व्यवहाराचे आणि विचार , संस्कार याचे प्रतिबिंब त्या संस्थेच्या वाटचालीत उमटत असते . या दृष्टीने सुरुवातीचे साठे किंवा भगवानराव जोशी ते आजचे आंबेकर , खिरवडकर हे सर्व आणि आजी , माजी संचालक मंडळ , अधिकारी याना यशाचे श्रेय नितीनजी यांनी दिले. बँकेने यावर्षी पुरस्कार दिले ते पण खरोखर उल्लेख करावा असे . जेंव्हा संस्था चालवताना आपण ही संस्था कशासाठी चालवतो याचे जर भान असेल तर सगळ्या गोष्टी सुसंगत घडतात आणि मग तो एक कार्यक्रम न राहता संस्कार, सद्विचार याची कार्यशाळा बनते . पुरस्कार प्राप्त श्री हब्बू हे संघर्ष आणि गरिबीतून यशस्वी उद्योजक बनलेले विद्युत आणि यांत्रिक अभियंते . सैन्यदलासाठी आवश्यक ते भारतीय बनावटीची अनेक उपकरणाची निर्मिती ते करतात तर पुण्याचे अमितजी घैसास बायोडिझेल निर्मिती आणि विद्युत उपकरणांची निर्मिती करतात . बँकेच्या या दोन्ही खातेदारांनी आत्मनिर्भर भारताचे सूत्र व्यवसायात अग्रेसित केले आहे हे त्यांना पुरस्कार देऊन , त्यांचा गौरव करून बँकेने सर्वांच्या समोर आणले आहे ते आत्मनिर्भर भारताच्या प्रेरणा अधिक गतिमान करण्यासाठी ! या कार्यकर्माचे अध्यक्ष होते कोकण प्रांत संघचालक सतीश जी मोढ ! त्यांनी सहकाराचे प्रयोग समाजाच्या सर्व क्षेत्रात व्हावे असे आवर्जून सांगितले ! या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सदाबहार श्री राहुल सोलापूरकर यांनी करताना सातारा मर्चंट बँकेचे विलीनी करण होताना समर्थ रामदास स्वामी यांच्या सज्जनगडावर स्वाक्षऱ्या झाल्या हे आवर्जून सांगितले आणि त्या दृष्टीने समर्थांच्या एका ओवीचे वर्णन पण केले. पोस्ट ऑफिस ने कल्याण बँकेची दखल घेत बॅंकेसाठी तयार केलेले पाकीट प्रकाशित केले हे या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिषट्य ! अंधारात , अंधार /अंधार असे ओरडून उपयोग नसतो तर कुठेतरी पणती पेटवावी लागते . कुणाला तेलासारखे खपावे लागते , ज्योती सारखे जळून राख व्हावे लागते . स्वतः वाहून घेत काही प्रमाण स्थापित करावे लागतात तेव्हा कुठे अंधार दूर होतो , काही निर्माण होते . सहकारातील स्वाहाकाराला संस्कार हेच उत्तर आहे . भ्रष्टचार आणि राजकारण याने किडलेल्या सहकारातील दुर्गंधीला विचारांची , त्याप्रमाणे कृतीशीलतेच्या सुगंधाची गरज आहे . असा सुगंध आज कल्याण येथील अत्रे सभागृहात दरवळताना तेथील सर्वांनी अनुभवला आणि तो मलाही अनुभवायला मिळाला हे माझ्यासारख्याना सकारात्मक ऊर्जा देणारे ठरले .

# ऊसशेती करणाऱ्या शेतकऱ्याची कोंडी मांडणारी कादंबरी : ऊसकोंडी

आधुनिक केसरी

**शेती आणि शेतकरी केंद्रस्थानी ठेवून मराठी साहित्यात आजवर विपुल प्रमाणात साहित्य निर्मिती झालेली आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांच्यापासून सुरू झालेली ही परंपरा आनंद यादव, मोहन पाटील, राजन गवस, कृष्णात खोत, डॉ. श्रीकांत पाटील यांच्यापर्यंतची आहे. शेती आणि शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची कारणे मांडताना महात्मा फुलेंनी शेतकऱ्यांचा आसूड लिहिले आणि कुणब्याच्या दुःखाच्या व गरिबीच्या तळाशी अविद्या हे प्रमुख कारण आहे असा सिद्धांत मांडला. त्यांनी सुरू केलेली शैक्षणिक क्रांती राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील ते आत्ताच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान युगापर्यंत येऊन पोहोचली आहे.**

शिक्षणाने समाज आमुलाग्र बदलला आहे. पण केवळ समाजच बदलला नाही तर मानवी उपजीविकेची साधनेही बदलली. या बदलातून कृषी संस्कृती ही सुटली नाही. विज्ञानाने कृषी संस्कृतीला नवसंजीवनी दिली. तंत्रज्ञानाच्या उंबरठ्यावर आपल्या आजोबा, वडिलांच्या शेतीत बैलांच्या जीवावर चालणारा नांगर बंद झाला आणि त्या जागी शेतीची मशागत करणारा ट्रॅक्टर आला. विहिरीवरची मोट जाऊन त्या जागी इंजिन आलं. त्यामुळे पारंपारिक शेती बदलली आणि शेतीची वाटचाल विज्ञानाच्या दिशेने सुरू झाली. या बदलावरती आनंद यादवांनी गोतावळा ही कादंबरी लिहिली. कारण येणारे बदल नाकारून शेतकरी सुखी होणार नव्हता आणि आजही तो हे सर्व बदल स्वीकारून सुखी झालेला नाही. कारण बदलती व्यवस्था ही मूठभर भांडवलदारांच्या हातात गेली.

औद्योगिक क्रांतीनंतर साखर कारखानदारीचा उदय झाला. ऊस शेतीला महत्त्व आले. पाणीपुरवठा संस्था उभ्या राहू लागल्या. त्यामुळे ऊस शेती आणि साखर कारखानदारी ही शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित असलेली सर्वात महत्त्वाची बाब ठरली. या साखर उद्योगाचे शेपूट धरूनच दुग्ध उत्पादनाबाबतची श्वेतक्रांतीही जन्मास आली. सहकारी सोसायट्यांच व सहकारावर चालणाऱ्या संस्थांचे जाळं विणले गेलं. या क्रांतिकारी बदलांच्यामुळे शेतकरी संपन्न व्हायला पाहिजे होता. तो सुखी झाला पाहिजे होता. परंतु या संस्थांच्या माध्यमातून त्याची अधिकाधिक पिळणूक होऊ लागली. सहकाराच्या माध्यमातून भांडवलदारी राजकारण उदयास आलं आणि शेतकरी केवळ नावापुरताच या सहकारी संस्थांचा मालक झाला. या संस्था राजकारणाचे अड्डे बनल्या. ऊस शेतीसारखं पीक हे शेतकऱ्याच्या हाती नगदी चलन देणारं अत्यंत महत्त्वाचं पीक ठरलं. या ऊस शेतीने शेतकऱ्यांच्या जीवनात महत्त्वाचं परिवर्तन केलं. असं जरी चित्र दिसत असलं तरी खऱ्या अर्थाने शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्या श्रमजीवी वर्गाचं शोषण सुरू झालं. त्यामुळे अनेक साहित्यिकांनी कृषी संस्कृतीशी निगडित असलेल्या वर्गाच्या वेदनेवरती, दुःखावरती साहित्य निर्मिती केली आणि शोषण करणाऱ्या संस्थांच्या कार्यपद्धतीवर टोकदारपणे भाष्य केले. यामध्ये मोहन पाटील, वासुदेव मुलाटे, आसाराम लोमटे, सरदार जाधव, बाबाराव मुसळे, बा. ग. केसरकर, इंद्रजीत भालेराव, सुरेश मोहिते, सचिन पाटील आणि डॉ. श्रीकांत पाटील इत्यादी साहित्यिकांनी परखडपणे साहित्य निर्मिती करून शेतकऱ्यांच्या जगण्याचं वास्तव मांडलं आहे.

विज्ञान तंत्रज्ञान युगानं शेतकऱ्यांच्या जीवनात अनेक भौतिक सुधारणा आणल्या. एका बाजूला त्यांच्या भौतिक गरजा वाढत असताना दुसऱ्या बाजूला त्याच्या शेतीच्या उत्पादनाचा खर्चही वाढत होता. कारण त्याच्या उत्पादनाला मिळणारे दाम उत्पादन खर्चाच्या पटीत खूप कमी होतं. त्यामुळे तो पतसंस्था, बँका आणि सावकारीच्या विळख्यात अडकत गेला आणि अगतिक झालेल्या शेतकऱ्याने गळफास जवळ केला. त्यामुळे महाराष्ट्रात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांचं प्रमाण वाढत गेलं या सर्व घडामोडीकडे लेखकवर्ग अत्यंत संवेदनशीलपणे पाहत होता. पण त्यांनी जे अनुभवलं ते जसेच्या तसे मांडण्याचा प्रयत्न केला. अनेकांनी केवळ साहित्यातून हे प्रश्न मांडले परंतु त्या प्रश्नांची उत्तरे शोधली नाहीत. अशा साहित्याने खचलेल्या शेतकऱ्याला जगण्याची उभारी मिळाली नाही. ती उभारी देण्याचं काम डॉ श्रीकांत पाटील यांच्या ऊस कोंडी कादंबरीने केलं आहे.




ऊसकोंडी या कादंबरीतून डॉ. श्रीकांत पाटील यांनी केवळ प्रश्न न मांडता शेतकऱ्यांच्या जीवनात दररोज निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे काम केलं आहे. त्यामुळे या कादंबरीचा प्रवास निराशेच्या अंधकारातून सकारात्मकतेच्या उजेडापर्यंतचा झाला आहे. कादंबरीची सुरुवात कादंबरीचा नायक मनुदा याच्या अगतिकतेपासून झाली आहे. उसाची "शेवटची खेप कारखान्याला गेली, तसा मनुदाने सुटकेचा श्वास सोडला. देणी भागवली आणि बिन वंगलेल्या सायकलवरनं त्यानं घर गाठलं " पान नंबर नऊ वरील हे वाक्य त्याच्या कष्टाच्या आणि अडचणीच्या परिस्थितीचा विशाल पट मांडते. माझा ऊस शेवटी गुलाल टाकूनच नेला. मी काय पाप केलं म्हणून हा भोग माझ्या नशिबी आला. अरे किती जण अडवणूक करणारा. मी ऊस पिकवला ही माझी चूक झाली काय ? या वाक्यातून मनुदा सारख्या असंख्य शेतकऱ्यांची अगतिकताच या कादंबरीने मांडली आहे. ही अगतिकता हतबलतेपेक्षा व्यवस्थे विरुद्धच्या चिडीतून व्यक्त झालेली आहे. या कादंबरीचा नायक मनुदा हातबल नसून व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करण्याची मानसिकता बाळगून आहे. त्याला शेतीसाठी मदत करणारा मजुरांच्या टोळीचा नायक जयसिंग, शेतात ट्रॅक्टरने मेहनत करणारा बसऱ्या व पाणीपुरवठा संस्थेचे अध्यक्ष, पाटकरी, कारखान्याचे ऊस नोंदणी कार्यालय, तिथला चिटबॉय असलेला दीपक, ऊस तोडणाऱ्या टोळ्या, ट्रॅक्टर ड्रायव्हर, टोळीचा मुकादम ही सर्व मंडळी आपणच मालक आहोत अशा अविर्भावात या कादंबरीत वावरताना दिसतात आणि पावलागणिक ही मंडळी ऊसकरी शेतकऱ्यांची कोंडी करीत असतात. त्यांच्यावर सहकारातल्या प्रशासनाचा किंवा कारखान्याच्या चेअरमनचा अंकुश असत नाही. आपला ऊस कारखान्याला लवकरात लवकर जावा म्हणून कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्यांची ही व्यवस्था पिळवणूक करीत असते. शेतकऱ्यांच्या श्रमाचे दाम चोरणारी ही मंडळी एखाद्या जळू सारखं त्याचं शोषण करतात. साखर कारखान्यावर होणाऱ्या काटा मारीवर आणि ऊस बिलाचे तुकडे करून मिळणारे पैसे यावर देखील डॉ श्रीकांत पाटील यांनी जळजळीत शब्दात भाष्य केलं आहे. या व्यवस्थेतून चालणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणाविरोधात लढणारी शेतकरी संघटना कादंबरीच्या नायकाला आपली वाटते. म्हणूनच तो ऊस दरासाठी चाललेल्या संघटनेच्या आंदोलनाकडे सकारात्मकतेने पाहतो. संघटनेच्या आंदोलनाची झळ त्यालाही बसते. त्याचा ऊस तोडून पडलेला असतो. आंदोलनामुळे तो कारखान्याला न जाता वाळत पडलेला असताना सुद्धा तो दुःखी होत नाही. कारण त्याला माहिती असते की, चाललेले आंदोलन हे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे. शेतकऱ्यांची चळवळ टिकली तरच उसाला हमीभाव मिळेल असा मनूला आत्मविश्वास वाटत असतो. शेवटी त्याचा ऊस कारखान्याला शेवटची ट्रॉली म्हणून गुलाल टाकूनच जातो तेव्हा त्याचे वडील त्याला सल्ला देतात व म्हणतात पोरा बास करूया उसाचा नाद. त्यापेक्षा आपण खरीप आणि रब्बीची पारंपरिक शेती करूया. यावर मनुदा म्हणतो आबा मला पण तसंच वाटायला लागलेया .मुलखाचे महाग बियाणे आणायचं, महागडी खत घालायची, तीन-चार वेळा औषध मारायची, सापाच्या मुंडक्यावर पाय देऊन उसाला पाणी पाजायचं, गड्या माणसासनी फुलावाणी जपायचं अन आपल्या पदरात काय ? असं बोलून जातो.पण तरी सुद्धा कादंबरीचा नायक मनुदा पुन्हा एकदा नव्या आशेने उसाच्या खोडव्याला पाणी देतो आणि साखर फेरा अनुभवून सुद्धा साखर पेरा जगवण्यासाठी नव्या जोमाने कामाला लागतो. इथे भविष्यातील सकारात्मक जगण्याचा विचार देऊन ही कादंबरी संपते हे या कादंबरीचे यश मानावं लागेल. या कादंबरीने शेतकरी व शेतीवर अवलंबून असणाऱ्या कष्टकऱ्यांच्या जीवनाचा एक विशाल पट मांडला आहे. शेतकरी किती उदार मनाचा असू शकतो याचे उदाहरण देताना लेखकाने मनुदाच्या उसातली वैरण चोरून नेणाऱ्या हऱ्या पवाराचे उदाहरण दिले आहे. खऱ्या अर्थाने मनाने राजा असणारा शेतकरी चोरीचा व्यवहार उमजून, कळून सुद्धा चोरी करणाऱ्यालाच वैरणीचा भारा उचलू लागतो. पान 156 वरील हा प्रसंग खूप बोलका झाला आहे. वारणा काठच्या बोलीभाषेतील नेटके व प्रभावी ग्रामीण संवाद हे या कादंबरीचे वैशिष्ट्य मानता येईल. या कादंबरीतील सर्वच पात्रे बाह्यंगातून व्यक्त न होता अंतरंगातून व्यक्त होताना दिसतात व ती जशीच्या तशी वाचकांच्या नजरेसमोर उभी राहतात. ही सर्व व्यक्ती चित्रे त्यांच्या स्वभावांच्या गुणविशेषासह कसदारपणे उभी केलेली आहेत. लेखक स्वतःच शेतकरी असल्यामुळे शेती आणि शेतीशी निगडित असलेल्या गोष्टींचे बारकावे अत्यंत सूक्ष्मपणे यामध्ये मांडलेले आहेत. शेती ज्या श्रमजीवी वर्गाच्या जीवावर चालते त्या वर्गाच्या व्यथा व शेतकऱ्यांशी असलेले त्यांचे संबंध हळुवारपणे जपताना कादंबरीच्या नायकाला करावी लागणारी तारेवरची कसरत लेखकाने अनुभव संपन्नतेने यामध्ये मांडली आहे. सर्वच अडचणींना सामोरा जाणारा मनुदा शेवटी व्यवस्थेलाच आव्हान करण्याची मनीषा बाळगून असतो त्यामुळे तो आत्मनिर्भर होतो व पिळवणूक करणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात लढण्याची तयारी करतो. मनुदा हा एक व्यक्ती न राहता तो समस्त शेतकऱ्यांचा प्रतिनिधी म्हणूनच कादंबरीत वावरताना दिसतो. त्याच्या विचारातूनच ही कादंबरी केवळ शेतकऱ्यांचे प्रश्न न मांडता त्या प्रश्नांची सकारात्मक उत्तरे शोधणारा एक दस्तऐवज म्हणूनच वाचकांच्या समोर येते. मराठी साहित्यात या कादंबरीचे एक वेगळेपण निश्चितपणे अधोरेखित झालेले आहे. शिवाय सद्य परिस्थितीत आत्महत्येचा विचार करणाऱ्या शेतकऱ्याला जगण्याचं बळ देणारी व डोळस बनवणारी ही ऊसकोंडी कादंबरी मराठी साहित्यातला मैलाचा दगड ठरेल असा मला आत्मविश्वास वाटतो.

**ऊसकोंडी – डॉ.श्रीकांत पाटील. प्रकाशक-ललित पब्लिकेशन, मुंबई मूल्य-२५०***

दि. बा. पाटील
कामेरी, जि.सांगली.

# साहित्यिका स्व. सुंदराबाई आंधळे साहित्यरत्न पुरस्काराने कविताताई खेडकर सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पाटोदा महिला संघटन, ओबीसी चळवळ व सामाजिक क्षेत्रात नेहमी आघाडीवर असलेल्या पाटोदा तालुक्यातील अनपटवाडी येथील व सध्या मुंबई येथे वास्तव करीत असलेल्या कविताई खेडकर ह्या कुठल्याही अपेक्षा न ठेवता महिलाचे प्रश्न व वंजारी समाजाच्या भल्यासाठी नेहमीच लढत असल्यामुळे कविताई खेडकर यांचे समाजकार्य पाहून आजतागायत सर्व सामान्यांची निस्वार्थ सेवेत कार्यरत असल्या बद्दल कार्याचा गौरव म्हणून वंजारी महासंघ महाराष्ट्रराज्य साहित्य आघाडी संमेलन नाशिक येते वंजारी महासंघ महाराष्ट्रराज्य साहित्य आघाडी यांनी नाशिकमधील संमेलना मध्ये साहित्यिका स्वर्गीय सुंदराबाई मुरलीधर आंधळे यांच्या स्मरणार्थ वंजारी महासंघ महाराष्ट्रराज्य यांच्या वतीने साहित्यरत्न महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यात आला. यावर्षी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला कविताताई खेडकर यांना यावर्षीचा वंजारी महासंघाचा प्रतिष्ठेचा समजला जाणारा स्वर्गीय सुंदराबाई मुरलीधर आंधळे साहित्यरत्न महाराष्ट्र भूषण वंजारी महासंघाचा प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार कविताताई खेडकर यांना प्रशांत आंधळे, बाबाराव मुसळे, वंजारी समाज इतिहासाचे गाडे अभ्यासक तथा लेखक गणेश खाडे यांच्यासह विविध मान्यवरांच्या हास्ते भव्य दिव्य पुरस्कार वितरण सोहळ्यात कविताताई खेडकर यांना सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे सन्मानित करण्यात आला यावेळी वंजारी महासंघाचे राज्यभरातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरस्कार दिल्याने कविताताई खेडकर यांनी वंजारी महासंघ महाराष्ट्र राज्य साहित्य संमेलन आघाडीचे आभार मानले.



# प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये साहित्यरत्न पुरस्काराने सन्मानित !

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** येथे संपन्न झालेल्या पहिल्या राज्यस्तरीय वंजारी साहित्य संमेलनात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते, लेखक, कवी, कीर्तन-प्रबोधनकार, योग-प्राणायाम प्रशिक्षक प्रा.डॉ. विठ्ठल खंडूजी जायभाये यांना साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रावसाहेब थोरात सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे दिनांक २५ डिसेंबर, २०२२ रविवार रोजी वंजारी महासंघ साहित्य आघाडीच्या वतीने वंजारी समाजाचे पहिले एकदिवशीय राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले होते. या साहित्य संमेलनाला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी, लेखक खांदेशरत्न प्रा. वा.ना.आंधळे हे अध्यक्ष तर सुप्रसिद्ध जेष्ठ कादंबरीकार, कथाकार, कवी विदर्भरत्न श्री बाबाराव मुसळे हे उद्घाटक म्हणून लाभले होते. साहित्य संमेलनात ग्रंथदिंडी, उद्घाटन सोहळा, परिसंवाद, कथाकथन, काव्यवाचन आदी कार्यक्रम आणि मान्यवर साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या प्रसंगी मागील २०-२२ वर्षापासून डॉ.जायभाये आपल्या कीर्तन-प्रबोधन-व्याख्यानाच्या माध्यमातून सडेतोड विचार पेरत आहेत आणि कविता, समीक्षण आणि विविध महापुरुषांचे योगदान, संतवाङ्मय, तुकाराम नीती सदरआणि वर्तमानातील विविध विषयावर महाराष्ट्रातील अनेक अग्रगण्य वर्तमानपत्रात लेखनाद्वारे जागृती करण्याचे काम सातत्याने चालू आहे. तसेच आपल्या युट्युबचॅनेल द्वाराविविध प्रकारचे शैक्षणिक प्रबोधन कार्य सुरू आहे. या सर्वच कार्याची आणि त्यांच्या



जाज्वल्य वक्तृत्वाची नोंद घेऊन प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांना स्व.सुंदराबाई मुरलीधर आंधळे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ नाशिक येथील जेष्ठ उद्योजक मा.श्री बुधाजीराव पानसरे, मा.सौ.कांचनताई खाडे, सिद्धिविनायक मानव कल्याण विकास मिशन, नाशिकचे ह.भ.प.डॉ.तुळसीदास महाराज गुट्टे, वंजारी महासंघाचे संस्थापक श्री गणेश खाडे, दूरदर्शन निवेदक मा.श्री लक्षराज सानप, संमेलन अध्यक्ष मा.प्रा.वा.ना.आंधळे, उद्घाटक मा.श्री बाबाराव मुसळे, स्वागताध्यक्ष मा.श्री प्रशांत आंधळे आणि अन्य जेष्ठ-श्रेष्ठ मान्यवरांच्या उपस्थितीत साहित्यभूषण हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे!



# ममुराबाद येथे नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील जानेफळ ममुराबाद शेलगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीत जय बजरंग बली आदर्श पॅनलचे सरपंच पदाचे उमेदवार भागुबाई रंगनाथ अटुळे व ग्रामपंचायत सदस्य निवडून आल्याबद्दल ममुराबाद गावात काल दिनांक 25 डिसेंबर रोजी गावकऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रसंगी ममुराबाद जानेफळ शेलगाव ग्रुप ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी निवड झालेल्या भागुबाई अटुळे, माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य कृष्णा गावंडे, सखुबाई जनार्दन वेताळ, विजय गायकवाड, सुभानबी शेख, बबन खिल्लारे यांच्या सह आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी पोपट गावंडे, नवाब शेख, साबेर शेख, जावेद पटेल, अफसर शेख, कैसर पटेल, दाऊद पटेल, अफझल शेख, सुखदेव वेताळ, सूरेश गायकवाड, अप्पासाहेब वेताळ, बब्बू शेख, रउफ शेख, शिवाजी वेताळ, दगडु शेख, ताहेर शेख यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

# भारतीय बौद्ध महासभेकडून परघरमोल यांचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपूर :** सूर्यपुत्र भैय्यासाहेब आंबेडकर जयंती व २५ डिसेंबर (मनुस्मृति दहन) महिला मुक्तीदिनाचे निमित्त साधून भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा संग्रामपूर यांच्याकडून भिमराव परघरमोल (लेखक व्याख्याचा तथा अभ्यासक फुले, शाहू, आंबेडकरी विचारधारा तेल्हारा जि. अकोला) यांच्यासह अनेक व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. भैय्यासाहेब आंबेडकर जयंती व महिला मुक्ती दिनाचे निमित्त साधून तालुका शाखा संग्रामपूरच्या पदाधिकाऱ्यांनी वरवट (बकाल) तालुका संग्रामपूर येथे आयोजित केलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊराव गव्हांदे (तालुका अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा शाखा संग्रामपूर) हे होते, तर विचार पिठावर रामकृष्ण रजाने, मोहन इंगळे, साहेबराव भगत, भिमराव परघरमोल, एड. खंडेराव, एड. नितीन गव्हांदे यांची उपस्थिती होती. महापुरुषांच्या प्रतिमापूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर समाजातील काही वयोवृद्ध कार्यकर्ते, ज्यांनी समाजाच्या उत्थानासाठी, समाजामध्ये अमुलाग्र बदल होऊन धम्मनीतीनियमांचे प्रतिबिंब समाज घटकांमध्ये दिसून येण्यासाठी आपली हयात संपवली. आयुष्याच्या शेवटी त्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप म्हणून अठरा वयोवृद्ध तर दोन मरणोत्तर कार्यकर्त्यांचा स्मृतिचिन्ह, महावस्त्र (शॉल) प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. त्यामध्ये भिमराव परघरमोल यांच्या साहित्य लेखनाची व समाजकार्याची दखल घेऊन त्यांचाही सन्मान करून काही नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांचाही प्रमाणपत्र व पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला.

# बिडकीन येथे 56 व्या वार्षिक निरंकारी संत समागमचे भव्य आयोजन

## सद्गुरु माताजी सुदिक्षाजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**बिडकीन :** औरंगाबाद येथील बिडकीनमध्ये 56 व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन निरंकारी मिशनच्या प्रमुख सद्गुरु माताजी सुदिक्षा जी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. 27 ते 30 जानेवारी रोजी होत आहे. या समागमाच्या पूर्वतयारीसाठी स्वेच्छा सेवांचा शुभारंभ रविवारी झाला असून त्यांचे उद्घाटन मोहन छाबडा यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या सोहळ्यात समागम समितीचे सदस्य सेवा दल अधिकारी, औरंगाबाद व आसपासचे क्षेत्र व्यतिरिक्त मुंबईसह महाराष्ट्रातील वेगवेगळ्या ठिकाणहून आलेले हजारो भाविक सहभागी झाले होते. मानवतेचा कल्याणकारी संदेश जनसमांन्यांपर्यंत पोहोचणे हा या संत समागमाचा मुख्य उद्देश आहे. यापूर्वी महाराष्ट्राच्या वार्षिक निरंकारी संत समागमची श्रृंखलासन 2019 पर्यंत मुंबई महानगर परिक्षेत्रातच आयोजित होत आली. सद्गुरु माताजीच्या पावन अध्यक्षतेखाली आयोजित होत असलेल्या या दिव्य संत समागमचा भरपूर आनंद प्राप्त करण्यासाठी देश विदेशातील लाखो भाविक भक्तगण सहभागी होणार आहेत. समागम स्थळावर दररोज अनेक महात्मा सेवा दल महिला व पुरुष स्वयंसेवक आहेत आणि भक्तगण आपल्या सेवा प्रदान करीत आहेत. हा दिव्य संत समागम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी झालेले निरंकारी सेवादलचे स्वयंसेवक मोठ्या श्रद्धेने आणि तन्मयतेने पूर्वतयारीच्या सेवाकार्यामध्ये आपले योगदान देऊ लागले आहेत फक्त गाण्याच्या निष्काम सेवा द्वारे समागम स्थळ एका सुंदर सुंदर शामियान्याच्या नगरीमध्ये प्रवीण झालेले दिसेल. ज्यामध्ये भक्तांच्या निवासाची व्यवस्था, जलपान व अन्य मूलभूत व्यवस्था प्रशासन व अधिकाऱ्याच्या सहयोगाने करण्यात येत आहे. त्याबरोबरच समागम स्थळावर विविध प्रबंध कार्यालय प्रकाशन स्टॉल, प्रदर्शनी, लंगर, कॅन्टीन आणि डिस्पेन्सरी इत्यादी सुविधा आवश्यकतेनुसार करण्यात येणार आहे. उल्लेखनीय



आहे, की समागमाच्या कार्यक्रमाची संपूर्ण योजना, डिझायनिंग व क्रियान्वयन निरंकारी भक्तांकडूनच पार पाडले जात आहे. भक्तगण या सेवांना आपले सौभाग्य समजून सद्गुरुंच्या आशीर्वादाने लाभलेली सुसंधी मानून मोठ्या आनंदाने निभावत असतात. आध्यात्मिकतेच्या कुंभमेळ्याचे अनुपम दृश्य साकार करणारा हा दिव्य संत समागम दरवर्षीप्रमाणे याही वर्षी भक्तगणांसाठी प्रेरणादायी व आनंददायी ठरेल असा आयोजकांचा विश्वास आहे.

# मराठी पत्रकार संघाचे नाशिक शहराध्यक्ष दिलीप कोठावदे यांना खान्देश रत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** १३१ वेळा रक्तदान करून जगातील एकमेव पत्रकार ठरलेले महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे नाशिक शहराध्यक्ष दिलीप कोठावदे यांना भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व आरोग्य विज्ञान मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते खान्देश रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

नाशिक पश्चिमच्या आमदार सीमा हिरे व रश्मी हिरे-बेंडाळे यांच्या माध्यमातून गेल्या चार दिवसांपासून खान्देश महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. रविवारी ( दि.२५ ) महोत्सवाचा शानदार सोहळ्यात समारोप झाला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन, प्रदेश उपाध्यक्ष लक्ष्मण सावजी, जिल्हाध्यक्ष केदा आहेर, मनपा आयुक्त चंद्रकांत पूलकुंडलवार, देवयानी फरांदे, माजी महापौर सतिश कुलकर्णी, बाळासाहेब पाटील, अशोक पवार, गिरीश पालवे, मुकेश शहाणे, डॉ.वैभव महाले, विक्रांत पाटील, जगन पाटील, अविनाश पाटील, विक्रम नागरे,रवी पाटील, पिंटू काळे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना बावनकुळे यांनी केंद्रात व राज्यात भाजपचे सरकार असल्याने कोविडच्या प्रसारापासून महाराष्ट्र सुरक्षित असल्याचे सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील १२० कोटी जनतेचे दोन वेळा लसीकरण केले आहे. शिवाय बूस्टर डोसही दिला आहे. त्यामुळे राज्यातील जनतेने घाबरण्याचे काही कारण नसल्याचे ते म्हणाले. खान्देश महोत्सवाचे कौतुक करताना ते म्हणाले की, संस्कृती, विरासत आणि परंपरा यांचे संयुक्त दर्शन म्हणजेच खान्देश महोत्सव असल्याचे सांगून आयोजक आमदार सीमा हिरे यांचे त्यांनी विशेष अभिनंदन केले. यापुढे अधिक वेळ काढून खान्देश महोत्सवाचा आनंद घेण्याचे आश्वासनही बावनकुळे यांनी दिले. तर वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन यांनी खान्देश महोत्सवात मलाही गाण्याची इच्छा होती; परंतु घसा बसल्याने मला आता गाता येणार नसल्याचे सांगत सर्वांनी कोरोनाची काळजी घेण्याचे आवाहन केले. यापुढे गर्दीचे कार्यक्रम बंद करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. आमदार सीमा हिरे यांनी प्रास्ताविक केले. महेश हिरे व रश्मी हिरे यांनी आभार मानले. यांचा झाला सन्मान आपल्या कार्यकर्तृत्वाने विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविणाऱ्या गुजरातचे भाजपा प्रदेशाध्यक्ष सी.आर.पाटील यांच्यासह राज्य उत्पादन शुल्क आयुक्त विजय सूर्यवंशी,१३१ वेळा रक्तदान करणारे पत्रकार दिलीप कोठावदे, संस्कृती नाशिक, पहाट पाडवाचे प्रणेते शाहु खैरे,आदर्श शिक्षिका कुंदा बच्छाव शिंदे, कामगार ते यशस्वी उद्योजक बुधाजी पानसरे, उद्योजक मनोज कोतकर, रणजी क्रिकेटपटू सत्यजीत बच्छाव, अपंग संघटनेचे बाळासाहेब घुगे, निरुपणकार संजय धोंडगे महाराज, बहुभाषिक गायिका रायमा रज्जाक शेख ( पिहू ) व युनायटेड वुई स्टँड एनजीओ सागर मटाले यांचा खान्देश रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.



**शंकर महादेवन लाईव्ह :** 'सूर निरागस हो...', 'मोरया मोरया', 'गणपती बाप्पा मोरया', 'जयजय राम कृष्ण हरी', 'दिल चाहता हैं' अशा एकाहून एक सरस अशा हिंदी-मराठी गीतांच्या सादरीकरणाने नाशिकच्या बोचऱ्या थंडीत सुप्रसिद्ध गायक शंकर महादेवन यांनी ऊर्जा निर्माण करून थंडीला पळवून लावले. खूप वर्षांनंतर नाशिकमध्ये महादेवन यांचा लाईव्ह कार्यक्रम असल्याने तीस हजारावर नाशिककर रसिकांनी मोठी गर्दी केली होती. महादेवन यांनी त्यांच्या खास शैलीतील गाजलेली गाणी सादर करताच रसिकांनी मैदान डोक्यावर घेत उत्स्फूर्त दाद दिली.

# इंडियन मेडिकल असोसिएशन वैजापुर अध्यक्षपदी डॉ. डोंगरे




आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** राष्ट्रीय स्तरावरील इंडियन मेडिकल असोसिएशनच्या वैजापूर शाखेच्या नविन कार्यकारिणीची निवड सोमवार (ता.२६)रोजी करण्यात आली. मावळते अध्यक्ष डॉ,.एस. एम. जोशी व सचिव डॉ. सुभाष शेळके यांच्या उपस्थितीत शहरातील डॉक्टर्सची बैठक संपन्न झाली यात पुढील प्रमाणे नवीन कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली अध्यक्ष-डॉ.राजीव डोंगरे, उपाध्यक्ष-डॉ. चैतन तांबे, सचिव- डॉ. सुहास राहणे, सह सचिव- डॉ. सचिन राजपूत, कोषाध्यक्ष-डॉ.जयसिंह मरमट,कार्यकारिणी सदस्य-डॉ.एम.एन.मुन्शी व डॉ. कविता शेळके,निवड झाल्यानंतर डॉ. राजीव डोंगरे यांनी सांगितले की, सदरील शाखा ही राष्ट्रीय पातळीवरील मुख्य शाखेशी सलग्न असून या शाखे मार्फत राष्ट्रीय पातळीवरील डॉक्टरांच्या समस्या सोडविणे,डॉक्टर व्यवसाय नोंदणी, नूतनीकरण, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील अद्यावत वैद्यकीय मार्गदर्शन,शासनाच्या नियमांचे पालन, डॉक्टर वर्गाला अद्यावत वैद्यकीय ज्ञान माहिती देणे, चर्चात्मक वैद्यकीय परिषद आयोजित करणे, सातत्यपूर्ण वैद्यकीय मार्गदर्शन करणे, सांस्कृतिक क्षेत्र, क्रीडा स्पर्धा, वैद्यकीय कॅम्प आयौजित करून अहवाल आय.एम.ए.च्या मुख्य शाखेला सादर करणे इत्यादी कार्य या शाखेमार्फत घेणार असल्याचे डॉ.राजीव डोंगरे यांनी सांगितले.

# कोणत्याही महापुरुषाबद्दल चुकीचं वक्तव्य करू नये; सभापती धरमसिंग चव्हाण

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील व सावळदबारा परिसरात



कोणत्याही महापुरुषांच्या बाबतीत यानंतर चुकीचे वक्तव्य करु नये काही दिवसापूर्वी मुख्यमंत्री साहेब यांना निवेदन देऊन तसा कायदा सुषमा अंधारे या महिलांनी श्री संत ज्ञानेश्वर महार- अंमलात आणावा या मागणीसाठी महाराष्ट्रातील जांवर टीकास्त्र केलं त्या महिलेवर तात्काळ दंडात्मक तमाम वारकरी संप्रदायातील ह भ प सोपान महाराज कारवाई व्हावी यासाठी वारकरी संप्रदायातला शास्त्री ह भ प पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या महाराज मंडळी त्या महिलांनी केलं याच निषेधार्थ पुढाकारांनी मुख्यमंत्री शिंदे साहेब यांना निवेदन देऊन वारकरी संप्रदायाच्या महाराष्ट्रातील सर्व महाराज येणाऱ्या काळामध्ये महापुरुषाबद्दल जी अपमान करेल मंडळींनी एकत्र येऊन मुंबई येथे महाराष्ट्राच्या त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांची भेट घेऊन मागणी या ठिकाणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्रातील महापुरुषाबद्दल कोणीही टीका महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील सर्वच महाराज केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशे निवेदन मा. सभापती धरमसिंग चव्हाण सोयगाव पंचायत समितीचे मा.सभापती धरमसिंग चव्हाण यांनी सोयगाव तहसीलदार रमेश जसवंत यांच्या कडे देण्यात आले आहे.

# कृषी विभागामार्फत मका, हरभरा पिकावरील अळी नियंत्रणविषयी मार्गदर्शन व जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात मागील दोन वर्षात मका पिकावर लष्करी अळीचा तसेच हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे त्या अनुषंगाने कृषी विभागामार्फत क्रॉपसॅप अंतर्गत हॉटस्पॉट व्हिलेज दि.२४/१२/२२ रोजी किन्ही, पळाशी, नांदगाव येथे तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली मका, हरभरा बियाण्यावरील बीजप्रक्रिया केल्याने होणारे फायदे, मका, हरभरा पिकाच्या वाढ अवस्थेनुसार खत व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन



तसेच अळीचा प्रादुर्भाव झाल्यास इमामेक्टीन 8 ते 10 ग्रॅम प्रति पंप याप्रमाणे फवारणी करावी अशी माहिती कृषी पर्यवेक्षक हेमंत देशमुख, कृषि सहाय्यक किन्ही जयश्री वाघ व कृषी सहाय्यक पळाशी राधिका सोळूखे यांनी दिली तसेच शेतकऱ्यांना मका, हरभरा बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखविले. शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया करणेसाठी जैविक संघ कृषी विभामार्फत वाटप केले. सदरील प्रात्यक्षिक कार्यक्रमास गावाचे सरपंच, उपसरपंच तसेच शेतकरी बांधव उपस्थित होते.



# हिप्परगा थडी ग्रामपंचायत निवडणूक परिवर्तन पॅनलचे इनामदार गटाचे वर्चस्व


आधुनिक केसरी न्यूज

**ज्ञानेश्वर शिरगिरे**

**बिलोली :** तालुक्यातील हिप्परगा थडी ग्रामपंचायत निवडणूक दि.१८ रोजी मतदान झाले होते. त्या अनुषंगाने दि.२० रोजी १२ वाजता मतमोजणी होती त्यात हिप्परगा थडी ग्रामपंचायत निवडणूक परिवर्तन पॅनलचा ९ पैकी ५ उमेदवार विजयी झाले आहेत.

काँग्रेस पक्षाचे संरपंच पदाचे दावेदार इनामदार रहीबर रहीमबेग उमेदवार निवडून आले आहेत आणि वंचित बहुजन आघाडीचे तालुका सदस्य मारोती एडकेवार यांनी 3 पैकी २ वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विजयी झाले आहेत.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# आज शिक्षकच समाजाला वाचवू शकतो

## समता शिक्षक परिषदेच्या पुरस्कार सोहळयाप्रसंगी डॉक्टर श्रीपाल सबनीस यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** पहूर आज समाज अत्यंत बिकट परिस्थितीतून जात आहे. कधी नव्हे तेवढी आज लोकशाही धोक्यात आलेली आहे. धर्माधिष्ठित विचार समाजाला अत्यंत चुकीच्या दिशेने नेत आहेत. याचे संपूर्ण सावट देशाच्या भविष्यावर आहे. राजकारणी, एकांगी चळवळी, एकांगी संघटना व अतिरेकी विचार यांच्यामुळे भारतीय लोकशाही व संविधान संकटात सापडले असून आज संविधान संस्कृती जोपासणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक डॉक्टर श्रीपाल सबनीस यांनी महाराष्ट्र राज्य समता शिक्षक परिषदे मार्फत आयोजित गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात केले. आज देशाला शिक्षकच वाचवू शकतो. म्हणून शिक्षकांनी माणसा माणसांमध्ये भेद निर्माण करणाऱ्या विचारांना रोखण्यासाठी तयार राहिले पाहिजे. समता शिक्षक परिषद हे फुले- शाहू -आंबेडकरांना अभिप्रेत असलेल्या समतेवर आधारित समाजाची निर्मिती करण्यासाठी चालविलेले मिशन आहे. वैचारिक मंथन घडवून आणणे आणि बुद्धाचा प्रेम हा विचार घेऊन क्रांती प्रस्थापित करणे असा उदात्त हेतू या संघटनेचा आहे. शिक्षण क्षेत्राला अशाच प्रेमाच्या आणि समतेच्या विचाराची गरज आहे, असे सुद्धा डॉक्टर सबनीस यांनी आपल्या उद्घाटकीय भाषणात नमूद केले. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अण्णा साहेब डी. के. अहिरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉक्टर अनिल झोपे, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉक्टर डी. बी. साळुंखे, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉक्टर चंद्रकांत साळुंखे, बुलढाणा जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे अधिव्याख्याता धम्मरत्न वायवाळ, संघटनेचे प्राथमिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र गायकवाड,



संघटनेचे माध्यमिक विभागाचे प्रदेशाध्यक्ष प्रा. भरत शिरसाठ, अमळनेर पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विश्वास पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी अशोक बिऱ्हाडे, प्रसिद्ध साहित्यिक जयसिंग वाघ यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीमाई फुले, राजर्षी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले. संघटनेच्या समता विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. प्रा. शशीकांत बारी लिखित 'तान्हूले तू आलीस खरी...' व वर्षा अहिरराव लिखित निबंध वर्षा आणि पोएट्री अँड पोयटिक डिव्हाइसेस इत्यादी पुस्तकांचे प्रकाशान डॉक्टर श्रीपाल सबनीस व मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. सत्यशोधक चळवळ 150 व्या वर्षात पदार्पण करीत असल्यामुळे यावर्षी सत्यशोधक पुरस्काराचे वितरण संघटनेमार्फत करण्यात आले. सत्यशोधक समाज संघाचे अध्यक्ष अरविंद खैरनार यांना क्रांतीसुर्य तात्यासाहेब ज्योतीराव फुले सत्यशोधक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. जळगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या निवेदिता ताठे यांना प्रभावती बावस्कर यांचे स्मरणार्थ सावित्रीमाई फुले सत्यशोधक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# वैजापूरात सरकारच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी गोरगरीब, दीन -दुबळयांना मोफत कार्ड वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शहरातील गोर-गरीब,दीन-दुबळे, निराधार व मागासवर्गीय नागरिकांना केंद्र सरकार व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेता यावा म्हणून आवश्यक ई-श्रम कार्ड, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना कार्ड, नवीन शिधा पत्रिका इत्यादी आवश्यक प्रमाण पत्र मोफत वाटप कार्यक्रम रविवार(ता.२५) रोजी येथील संत सेना महाराज कार्यालयात संपन्न झाला. प्रभाग सहाचे रहिवाशी सोनू राजपूत व ई, सेवा सुविधा केंद्राचे प्रमुख गोरख मापारी यांनी यात पुढाकार घेतला. नगराध्यक्ष शिल्पाताई परदेशी व जेष्ठ नागरिक तथा



साहित्यिक धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते हे कार्ड या प्रभागातील गोर, गरीब व मागासवर्गीय नागरिकांना वाटप करण्यात आले. धोंडीराम राजपूत यांनी उपस्थित नागरिकांना आवाहन केले की राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजना साठी या कार्डचा लाभ होणार आहे,त्याचा योग्य वापर करून सांभाळून ठेवावे.


जवळपास चारशेच्यावर नागरिकांना हे सर्व कार्ड मोफत तयार करुन देण्यात आले. या प्रभागाचे सोनू राजपूत व गोरख मापारी यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम संपन्न झाला. या कामात त्यांना फरहान शेख राहुल त्रिभुवन, सागर त्रिभुवन, अमोल राजपूत,सुरेश आंबेकर, किरण दाढे, करन शिंदे यांनी सहकार्य केले. नगरसेवक गणेश खैरे, रघुनाथ जाधव ज्ञानेश्वर सिरसाट यांची उपस्थिती होती. शेवटी सोनू राजपूत यांनी आभार मानले.

# 36 क्रॉसवर्ड' या हिंदी चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण

## जीवन आणि मृत्यूच्या धाग्यांचा अनोखा शोध... अद्यावत तंत्रज्ञान असलेला हॉरर-थ्रिलर चित्रपट

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आरोही एंटरटेनमेंट प्रायव्हेट लिमिटेड आणि पर्स्पेक्टिव्ह डिझाईन स्टुडिओ यांची निर्मिती असलेल्या '36 क्रॉसवर्ड' या हिंदी हॉरर-थ्रिलर चित्रपटाचे पोस्टर प्रकाशन
नुकतेच नाशिक येथे भव्य कार्यक्रमात करण्यात आले. पंचतारांकित हॉटेल कोर्टयार्ड मॅरियट्समध्ये हा आकर्षक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. '36 क्रॉसवर्ड' या हिंदी चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण सुप्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, अभिनेत्री प्रार्थना बेहेरे, अभिनेत्री मिनाक्षी राठोड,दिग्दर्शक डॉ.मोतीलाल तायडे,अभिनेते कैलास वाघमारे,लेखक-गीतकार आशिष निनगुरकर, अभिनेत्री श्वेता पगार,संकलक डी. प्रसाद आणि डॉ. शुक्लिमा पोटे आदी दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. '36 क्रॉसवर्ड' या हिंदी सिनेमाचे कथानक जीवन आणि मृत्यूच्या काठावर आधारित आहे. मानवी मूल्ये, वास्तव आणि आपला भूतकाळ यांचा विविध अंगाने शोध घेत आहे. सर्व कथा एका गेममध्ये थ्रिलरमध्ये साचेबद्ध पद्धतीने रंगवण्यात येणार आहे.'कनेक्ट' हे नवीन तंत्र या चित्रपटात पहिल्यांदाच सिनेमाविश्वात सादर करण्यात येणार आहे. या सिनेमाचे अनोखे सादरीकरण आणि संकल्पना सिनेमातील मैलाचा दगड ठरणार आहे. आजचा सिनेमा हा त्याच्या आशयावर चालतो. कथा, संकल्पना आणि सादरीकरण हे या सिनेमाचे वेगळेपण असेल. कथा,




संकल्पना, संवाद आणि पटकथा वैद्यकीय व्यवसायातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व डॉ. मोतीलाल सी तायडे यांची आहे. डॉ. तायडे आणि त्यांची टीम गेल्या चार वर्षांपासून या स्क्रिप्टवर काम करत आहे. लवकरच या चित्रपटाचे शूटिंग सुरू होणार असून या सिनेमाचे दिग्दर्शन डॉ. मोतीलाल सी तायडे, डी प्रसाद आणि आशिष निनगुरकर करणार आहेत. या सिनेमासाठी आशिष निनगुरकर यांनी गीतकार म्हणून देखील भूमिका बजावली आहे. डी प्रसाद यांचे संकलन असून, संगीत आरके यांचे असून छायाचित्रण रवींद्र झा यांचे आहे. या सिनेमातील कलाकारांची नावे अद्याप गुलदस्त्यात ठेवण्यात आले आहेत.

# कुंभारी येथे अखिल भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे राज्यस्तरीय शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील कुंभारी येथे दोन दिवसीय शिबीर दि.२४ ते २५ डिसेंबर रोजी संपन्न झाले.अखिल भारतीय भट्राचार निर्मूलन संघर्ष समिती व ब्रिक्स हुमान राईटच्या वतीने मौजे कुंभारी तालुका जामनेर जिल्हा जळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्य स्तरीय शिबिरासाठी राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर (बाबा) राष्ट्रीय समन्वयक गिरिराज महिराज राष्ट्रीय सरचिटणीस अमोल नानजकर राष्ट्रीय उपाध्यक्ष शोभाताई बल्लाळ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष ॲड. राणीताई स्वामी प्रदेश अध्यक्ष अरुण चव्हाण देशमुख, प्रभाकर साळवे प्रदेश सरचिटणीस, तर प्रमुख पाहुणे सभापती बबंलुशेट भंसाळी फत्तेपूर,



प्रदेश अध्यक्ष लघुउद्योग श्रावण कुळे प्रदेश युवती सणा शेख मराठवाडा विभाग अध्यक्ष पंडित तिडके, जिल्हा अध्यक्ष प्रदीपजी जगताप औरंगाबाद, सोयगाव तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत, सोयगाव तालुका अध्यक्ष चेतन राठोड, सचिव शेख अज्जर फर्दापूर व सर्व मराठवाडा विभागातील विभागप्रमुख जिल्हाप्रमुख महिला जिल्हाप्रमुख सर्व सन्माननीय पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित शिबिरामध्ये माहिती अधिकार विधेयक या विषयावर भ्रष्टाचारावर आळ महिला संरक्षण लघुउद्योग विधेयक पारित करण्यासंदर्भात अशा अनेक विषयावर चर्चा या दोन दिवसीय शिबीराच्या माध्यमातून कार्यकर्त्यांना सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

# महिला सुरक्षितता लक्षात घेत पोलीस ठाणे वैजापूरात मार्शल आर्ट प्रशिक्षण

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील महिला पोलीस अंमलदार यांनी अधिक सक्षमपणे महिला व मुलींची सुरक्षितेतची जबाबदारी पार पाडावी याकरिता एस.पी. मनिष कलवानिया यांचे मार्गदर्शनाखाली, डी वाय एस पी महक स्वामी वैजापुर उपविभाग अंतर्गत कार्यरत पोलीस ठाणे वैजापुर, विरगाव, शिवुर येथील महिला पोलीस अंमलदार यांचे करिता दिनांक २५ डिसेम्बर रोजी ब्लॅक टायगर मार्शल आर्ट, वैजापूर यांचे संयुक्त विद्यमानाने मार्शल आर्ट प्रशिक्षणाचे आयोजन वैजापूर पोलीस ठाणे येथे करण्यात आले होते. यावेळी महिला अंमलदार यांना डीवायएसपी महक स्वामी यांनी स्वतः मार्शल आर्ट प्रात्यक्षिकांत सहभाग घेत महिला पोलीस अंमलदार यांना प्रोत्साहित केले. महिला पोलीस अंमलदार या दामिनी पथक, अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक पथक अशा विविध माध्यमांतून महिला व मुलींच्या सुरक्षितते करिता कर्तव्यार्थ असतात. शाळा / महाविद्यालये, बाजारपेठ, निर्मनुष्य रस्ते, बाग, वाहनतळ, रेल्वेस्टशेन, अशा ठिकाणी मुली / महिला यांचे छेडछाडीला प्रतिबंध घालण्यासाठी त्या कायम गस्त घातल असतात. महिला / मुलींना सख्याहरी, रोडरोमियो, शाळा / महाविद्यालया बाहेरिल टवाळखोर अशा कडुन होणा-या त्रासावर पोलीसांकडुन जलद प्रतिसाद मिळुन अशा टवाळखोरा विरूध्द सक्षमपणे कारवाई करण्यासाठी महिला पोलीसांना मार्शल आर्टचे प्रशिक्षण देण्यात आले असून यामुळे महिला पोलीस अंमलदार या अधिक सक्षम व उत्स्फुर्तपणे कोणत्याही परिस्थीतीला सामोरे जावुन महिला व मुलींची सुरक्षिततेची जबाबदारी प्रभावी पणे पार पाडुन संकटातील मुलीचे संरक्षण करुन टवाळखोराविरुध्द वेळीच व जलद गतीने अधिक प्रभावी पणे कारवाई करतील. ज्यामुळे महिला / मुली मध्ये सुरक्षिततेच्या भावनेसह, आत्मविश्वास निर्माण होण्यास मदत होईल. मार्शल आर्टच्या प्रशिक्षणामुळे महिला पोलीस अंमलदार या



सक्षम आणि खंबिर बनुन त्यांना अधिक प्रभावशील व प्रतिकारक्षम बनविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला असून महिला व मुली प्रतीच्या घडणा-या घटनांना वेळीच आळा घालुन अशा घटना रोखण्यासाठी प्रशिक्षित राहतील. तसेच संकटातील महिला व मुलगी ही महिला अंमलदारांना मैत्रीण समजुन तिच्या अडचणी मनमोकळया पणे बोलु शकतील. मार्शल आर्टच्या माध्यमांतून महिला अंमलदार यांना स्वरक्षणासह, इतरांच्या रक्षणांची जबाबदारीसह नेतृत्व क्षमतेला सुध्दा प्रोत्साहीत करण्यासाठी अशाप्रकारचे प्रशिक्षणांचे नियमित आयोजन यापुढे सुध्दा करण्यात येणारे असल्याचे यावेळी डी.वाय. एस.पी. स्वामी यांनी सांगितले. प्रसंगी पोलीस अधीक्षक यांनी आवाहन केले आहे कि, जिल्हयात महिला व मुलींना शाळेत / महाविद्यालयात अगर रस्त्याने जाताना येतांना कोणीही टवाळखोर त्रास देत असेल तर त्यांनी निसंकोचणे स्थानिक पोलीस ठाण्यास तक्रार करावी अथवा डायल ११२ किंवा नियंत्रणकक्ष क्रमांक ०२४०२३८१६३३ या क्रमांकावार तक्रार नोंदवावी. त्यांची माहिती गोपनीय ठेवली जाईल.